



दैनिक

# युवावार्ता

परिवर्तनाचा पुरस्कर्ता

Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com
RNI No. MAHMAR/2007/24252
तिकीट न लावण्याचा
पोष्ट परवाना : WPP - 264
पोष्टाचा परवाना क्रमांक
BII/RNP/SRP/25/2023-25






अहिल्यानगर । वर्ष १९ वे । अंक १९४। किंमत - ४ रू | संपादिका - सुशीला किसन हासे (बी.ए.) । संस्थापक - किसन भाऊ हासे (बी.जे.) ९८२२०३९४६० । कार्य. संपादक - सुदीप किसन हासे (एम.ई.कॉम्प.) | बुधवार १२/०८/२०२६ । पाने - ६





## महामार्गालगतची बेकायदा हॉटेल्स, ढाबे ६० दिवसांत होणार भुईसपाट ! नव्या व्यावसायिक बांधकामांवरही बंदी



युवावार्ता (प्रतिनिधी)

नवी दिल्ली - राष्ट्रीय महामार्गांच्या सुरक्षेला बाधा ठरणाऱ्या अनधिकृत ढाबे, खानावळी, हॉटेल्स, दुकाने तसेच अन्य व्यावसायिक आणि वाणिज्यिक बांधकामांवर आता थेट हातोडा पडणार आहे. महामार्गालगतची बेकायदा बांधकामे पुढील ६० दिवसांत हटविण्याचे आदेश राज्य सरकारने स्थानिक स्वराज्य संस्थांना दिले आहेत. त्याचबरोबर राष्ट्रीय महामार्गाच्या सुरक्षा क्षेत्रात यापुढे नव्याने ढाबा, खानावळ, हॉटेल किंवा कोणतेही व्यावसायिक बांधकाम उभारण्यास बंदी घालण्यात आली आहे. या निर्णयामुळे महामार्गालगत बेकायदा व्यवसाय करणाऱ्यांचे धाबे दणाणले आहेत.

राष्ट्रीय महामार्गांवरील वाढती अतिक्रमणे, अनधिकृत बांधकामे आणि सुरक्षा नियमांकडे होणारे दुर्लक्ष यामुळे अपघातांचा धोका वाढत असल्याच्या पार्श्वभूमीवर सर्वोच्च न्यायालयाने १३ एप्रिल २०२६ रोजी महापालिका, नगरपालिका आणि नगरपंचायतींना आवश्यक निर्देश दिले होते. त्यानुसार राज्याच्या नगरविकास विभागाने १० ऑगस्ट रोजी शासन परिपत्रक जारी करून या आदेशांची कठोर अंमलबजावणी करण्याचे निर्देश दिले आहेत.

महामार्गालगत यापूर्वी देण्यात आलेले परवाने, ना हरकत प्रमाणपत्रे आणि अन्य मंजुरींचाही फेरआढावा घेण्याचे आदेश देण्यात आले आहेत. सध्याचे सर्व परवाने ३० दिवसांत तपासून त्यांची वैधता तसेच राष्ट्रीय महामार्ग सुरक्षा नियमांशी त्यांचा मेळ आहे की नाही, याची पडताळणी केली जाणार आहे. यापुढे महामार्गाच्या सुरक्षा क्षेत्रात कोणतेही बांधकाम अथवा व्यावसायिक परवानगी देण्यापूर्वी राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण किंवा सार्वजनिक बांधकाम विभागाची पूर्वपरवानगी घेणे बंधनकारक करण्यात आले आहे बेकायदा बांधकामे आणि अतिक्रमणे हटविण्याची प्रक्रिया निर्धारित वेळेत पूर्ण करण्याची संयुक्त जबाबदारी जिल्हाधिकारी आणि पोलीस आयुक्त किंवा पोलीस अधीक्षकांवर सोपविण्यात आली आहे. राष्ट्रीय महामार्ग ज्या जिल्ह्यातून जातो, त्या प्रत्येक जिल्ह्यात जिल्हा महामार्ग सुरक्षा कृती दल स्थापन करण्यात येणार आहे.

या कृती दलात जिल्हा प्रशासन, पोलीस, राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरण, सार्वजनिक बांधकाम विभाग आणि संबंधित स्थानिक स्वराज्य संस्थांच्या अधिकाऱ्यांचा समावेश असेल. अतिक्रमण हटविण्याच्या कारवाईला अधिक वेग आणि प्रशासकीय समन्वय मिळण्याची शक्यता आहे. महामार्गाच्या सुरक्षेच्या दृष्टीने बांधकाम आणि जमीन वापरावरही कठोर निर्बंध आणले जाणार आहेत. महामार्गापासून ४० मीटरच्या आत निवासी आणि ७५ मीटरच्या आत व्यावसायिक वापरासाठी जमीन वापर बदलण्यास प्रतिबंध करणारी अधिसूचना ६० दिवसांत जारी करण्याचे निर्देश देण्यात आले.

## रेल्वेसाठी महामार्गावर चक्काजाम

### साडेतीन हजार आंदोलकांवर गुन्हा दाखल



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - पुणे- नाशिक रेल्वेसाठी तालुक्यातील हिवरगाव पावसा परिसरातील टोल नाक्याजवळ रविवारी सकाळी चक्काजाम आंदोलनप्रकरणी सुमारे साडेतीन हजार आंदोलनकर्त्यांविरुद्ध पोलिसांनी गुन्हे दाखल केले आहेत. आंदोलन करणाऱ्या पदाधिकाऱ्यांविरोधात राजकीय जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन केल्याप्रकरणी गुन्हे दाखल झाले आहेत. गुन्हे दाखल झालेल्या प्रमुख पदाधिकाऱ्यांमध्ये डॉ. जयश्री थोरात, अजय फटांगरे, शरद थोरात, किशोर टोकसे आर्दीचा समावेश आहे.

पुणे - नाशिक सेमी हाईस्पीड रेल्वे मार्ग रद्द करण्यात आला. याविरोधात सिन्नर, संगमनेर, नारायणगाव, मंचर, खेड व चाकण परिसरातील नागरिकांनी मोठ्या प्रमाणावर नाराजी व्यक्त केली. रेल्वे मार्गाच्या मागणीसाठी रविवारी एकाच दिवशी अहिल्यानगर, नाशिक व पुणे जिल्ह्यातील नाशिक-पुणे महामार्गावर चक्काजाम आंदोलन करण्यात आले. संगमनेरात सरळ रेल्वे व्हावी, यासाठी रविवारी सकाळी हिवरगाव पावसा टोल नाका परिसरात रेल्वे कृती समितीच्या वतीने चक्काजाम आंदोलन करण्यात आले. सुमारे तीन तास आंदोलन करण्यात आले. या काळात रास्ता रोको केल्यामुळे वाहनांची गैरसोय झाली. प्रशासनाने परवानगी नाकारली असतानाही हे आंदोलन करण्यात आले. चक्का जाम आंदोलनादरम्यान नाशिक व पुणे महामार्गावरील दोन्ही बाजुकडील वाहनांची मोठ्या प्रमाणावर कोंडी निर्माण झाली. वाहनांना नियोजितस्थळी येणे- (पान ३ वर)

## अवैध दारू विक्रीवर कठोर कारवाईची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - राज्य उत्पादन शुल्क विभागाने शहरात अवैध व बनावट दारूवर केलेल्या कारवाईचे स्वागत करताना दारूबंदी कृती समितीने अवैध आणि बनावट दारू विक्रीविरोधात अधिक व्यापक मोहीम राबविण्याची मागणी केली आहे. संगमनेर शहर व तालुक्यात टपऱ्यांपासून छोट्या-मोठ्या दुकानांपर्यंत तसेच हॉटेल व बारमध्ये अवैध दारू विक्री होत असल्याच्या तक्रारी नागरिकांकडून सातत्याने येत असल्याचा दावा समितीने केला आहे. अवैध दारू विक्रीवर केवळ किरकोळ कारवाई न करता संबंधित आस्थापनेवर नियमानुसार कठोर कारवाई करून परवाना रद्द करण्याची आणि आस्थापना सील करण्याची प्रक्रिया करावी, अशी मागणी दारूबंदी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष अमर कतारी यांनी केली आहे.

बनावट दारू नागरिकांच्या आरोग्यासाठी धोकादायक ठरू शकते. त्यामुळे जप्त करण्यात आलेल्या संशयित दारूचे अधिकृत प्रयोगशाळेत परीक्षण करण्यात यावे. त्यामध्ये आरोग्यास घातक घटक आढळल्यास संबंधितांवर लागू कायद्यानुसार कठोर गुन्हे दाखल करावेत, अशीही मागणी समितीने केली आहे.

पुन्हा विक्री सुरू होऊ नये यासाठी नियमित तपासणी- आखाड महिन्याचे शेवटचे काही दिवस शिल्लक असल्याने या काळात अवैध व बनावट दारू विक्री वाढण्याची शक्यता व्यक्त करत समितीने पोलिस प्रशासन व राज्य उत्पादन शुल्क विभागाने संगमनेर शहर व तालुक्यात विशेष धडक मोहीम राबवावी, अशी मागणी केली आहे. बनावट दारू तयार करणारे, विक्री करणारे तसेच त्यांना आश्रय देणाऱ्यांवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली आहे. कारवाई झाल्यानंतर त्याच ठिकाणी पुन्हा अवैध दारू विक्री सुरू होत असल्यास संबंधित यंत्रणांनी त्याकडे गांभीर्याने लक्ष द्यावे. कोणत्याही दबावाला किंवा गैरप्रकाराला बळी न पडता निष्पक्षपणे कायदेशीर कारवाई करावी, (पान २ वर)

## शिक्षक भरतीऐवजी शिक्षक अतिरिक्त करण्याचा निर्णय का ?

### शिक्षण विभागाच्या धोरणावर संताप, विद्यार्थ्यांचा प्रांत कार्यालयावर मोर्चा




युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - महाराष्ट्रात गेल्या अनेक वर्षांपासून शिक्षक भरती झालेली नसताना उपलब्ध शिक्षकांनाच अतिरिक्त ठरवून विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेशी तडजोड का केली जात आहे, असा सवाल उपस्थित करत मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आणि शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे यांच्या नावाने निवेदन देत छात्र भारती संघटनेच्या नेतृत्वाखाली महाविद्यालय विद्यार्थ्यांनी प्रांत कार्यालयावर मोर्चा नेत निवेदन दिले.

राज्यातील वरिष्ठ महाविद्यालयांशी संलग्न कनिष्ठ महाविद्यालयांमध्ये विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक हिताला बाधा पोहोचविणारे निर्णय घेतले जात असल्याचा आरोप निवेदनातून करण्यात आला आहे. शिक्षकांची कमतरता असताना भरती करण्याऐवजी तासिकांचा कालावधी कमी करणे, प्रात्यक्षिकांच्या बॅचमधील विद्यार्थ्यांची संख्या वाढविणे तसेच कला शाखेतील वैकल्पिक विषयांच्या तुकड्या कमी करणे, हे निर्णय विद्यार्थ्यांच्या भवितव्याच्या दृष्टीने घातक असल्याचे निवेदनात म्हटले आहे.

कनिष्ठ महाविद्यालयातील ४५ मिनिटांची तासिका कमी करून ४० मिनिटांची करण्यात आल्याने विद्यार्थ्यांचे दररोज सुमारे २० मिनिटे आणि आठवड्याला जवळपास दोन तासांचे अध्यापन कमी होत असल्याचा दावा करण्यात आला आहे. त्यामुळे तासिका पूर्ववत ४५ मिनिटांच्या कराव्यात, अशी प्रमुख मागणी करण्यात आली आहे.


विज्ञान शाखेतील प्रात्यक्षिकांसाठी विद्यार्थ्यांची बॅच २० वरून ३० करण्याचा निर्णयही धक्कादायक असल्याचे निवेदनात नमूद आहे. एका विषयासाठी सुमारे ३५ विद्यार्थ्यांमागे एका शिक्षकाची आवश्यकता असताना मोठ्या संख्येने विद्यार्थ्यांच्या बॅच तयार केल्याने प्रयोगशाळेतील अध्यापनाचा दर्जा (पान ३ वर)









# पद्मश्री डॉ. विखे साहित्य पुरस्कारांची घोषणा

## उत्तम कांबळे जीवनगौरव, शिंदे नाट्यसेवा, इनामदारांना कलागौरव, जोरी यांना साहित्य

लोणी- सहकार चळवळीचे जनक पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या १२६ व्या जयंती दिनाच्यानिमित्त देण्यात येणाऱ्या राज्यस्तरीय साहित्य, कलागौरव व प्रबोधन पुरस्कारांची घोषणा करण्यात आली आहे. यंदा 'पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे साहित्य जीवनगौरव पुरस्कार' ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना, 'राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार' सचिन शिंदे यांना तर, 'राज्यस्तरीय कलागौरव पुरस्कार' मालती इनामदार यांना देण्याचा निर्णय घेण्यात आला आहे, अशी माहिती पुरस्कार निवड समितीचे अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे यांनी दिली.

पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील यांच्या जयंतीदिनी साहित्य, कला, नाट्य व प्रबोधन क्षेत्रात उल्लेखनीय कार्य करणाऱ्या व्यक्तींना पुरस्कार देऊन सन्मानित करण्याचा उपक्रम प्रवरा परिवाराने सुरू केला आहे. यंदा पुरस्काराचे ३६ वे वर्ष आहे. पद्मश्री जयंतीदिनी गुरुवार (दि. २७ ऑगस्ट) रोजी नारळी पौर्णिमेनिमित्त प्रवरानगर येथे राज्य व जिल्हास्तरीय पुरस्कारांचे वितरण ९९ व्या अखिल भारतीय मराठी साहित्य संमेलनाचे अध्यक्ष विश्वास पाटील यांच्या हस्ते तर, जलसंपदा मंत्री राधाकृष्ण विखे पाटील, माजी मंत्री अण्णासाहेब म्हस्के पाटील व कारखान्याचे चेअरमन डॉ. सुजय विखे पाटील यांच्या उपस्थितीत होणार आहे. निवड समितीत अध्यक्ष डॉ. रावसाहेब कसबे, डॉ. एकनाथ पगार, डॉ. दिलीप धोंगडे व प्रा. डॉ. राजेंद्र सलालकर यांनी काम पाहिले.

यंदा ज्येष्ठ साहित्यिक उत्तम कांबळे यांना 'साहित्य जीवनगौरव पुरस्कार' देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. १ लाख रुपये व स्मृतिचिन्ह असे या पुरस्काराचे स्वरूप आहे. पुरस्कारार्थी कांबळे यांनी पत्रकार ते साहित्यिक असा यशस्वी प्रवास करताना, सम्पूजातील शोषित, वंचित घटकांचे दुःख समजून घेतले. पत्रकारितेन फील्डवर काम करताना आलेले स्वानुभव साहित्याच्या माध्यमातून



वाचकांसमोर आणण्याच्या त्यांच्या यशस्वी प्रयत्नांचा सन्मान म्हणून त्यांच्या नावाची निवड करण्यात आली, असे सांगण्यात आले.

सुरेंद्र दरेकर यांच्या 'समर ऑफ सेव्हेंटी नाईन' या कादंबरीस 'राज्यस्तरीय विशेष साहित्य पुरस्कार' (२५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह) देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. 'नाटच प्रयोगांपासून ते प्रायोगिक नाटकांसाठी काम करताना 'नाख्यचौफुला' अंतर्गत सलग चार नाट्य प्रयोगांचे महाराष्ट्रभर प्रयोग सादर करुन, एकूण ३५ नाटके व ५० हून अधिक एकांकिकांचे दिग्दर्शन करणारे सचिन शिंदे यांना 'पद्मश्री डॉ. विठ्ठलराव विखे पाटील राज्यस्तरीय नाट्यसेवा पुरस्कार' जाहीर झाला आहे. आपल्या मातोश्री विठाबाई नारायणगावकर यांच्याकडून नृत्य व सैभिवाचे धडे गिरवून, तमाश्रत कलेला पुढे घेऊन जाणाऱ्या मालती इनामदार यांना 'राज्यस्तरीय कलागौरव तमाशा कलावंत पुरस्कार' (२५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह) देऊन गौरविले जाणार आहे.

मराठी भाषेच्या हितासाठी व समृद्धीच्या अनुषंगाने पूरक ठरणारे कार्यशाळा, व्याख्याने, परिसंवाद असे उपक्रम आयोजित करून, मराठी भाषेसाठी समर्पित भावनेने काम करणारी संस्था म्हणून मराठी साहित्य परिषदेची ओळख आहे. या संस्थेस यावर्षी 'राज्यस्तरीय प्रबोधन पुरस्कार' देण्याचा निर्णय निवड समितीने घेतला आहे. याही पुरस्काराचे स्वरूप २५ हजार रुपये व स्मृतिचिन्ह असे आहे. सामान्य घरातील खेड्यातून आलेल्या तरुणाला नोकरी मिळाल्या नंतरही घर, कुटुंब, गाव, नातेसंबंध यांना सांभाळताना जो कटू अनुभव येतो, त्यातून मनाची जी घालमेल होते, त्याचे जिवंत चित्रण 'खटपट' या आत्मचरित्रातून शब्दबद्ध करणारे निवृत्ती जोरी यांना यंदाचा 'अहिल्यानगर जिल्हास्तरीय साहित्य पुरस्कार' (१० हजार रुपये व स्मृतिचिन्ह) जाहीर झाला आहे. तसेच 'शांतीच्या शोधात' या पुस्तकास 'उत्तेजनार्थ साहित्य पुरस्कार' (५ हजार रुपये व स्मृतीचिन्ह) देऊन प्रोत्साहित केले आहे.

'राज्यस्तरीय उत्कृष्ट साहित्य पुरस्कार' (५१ हजार रुपये व स्मृतिचिन्ह) पुणे येथील संहिता राजन यांच्या 'चल गं सखे वारुळाला' या कथासंग्रहास दिला जाणार आहे. त्या माहिती तंत्रज्ञान क्षेत्रातील आघाडीच्या तरुण लेखिका आहे. जागतिकीकरणाच्या प्रक्रियेत स्त्री संगणक अभियंत्यांच्या अस्तित्वाभोवती निर्माण झालेल्या नव्या नैपथ्याची मांडणी लिखाणातून करुन, त्याचे भेसूर चित्र त्यांनी कथानकाच्या माध्यमातून पुढे आणले आहे.

# कुंभमेळा विकासकामांत अकोल्याचा समावेश करण्याची आ. लहामटेंची मागणी

युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - कुंभमेळा विकासकामांमध्ये अकोले विधानसभा मतदारसंघातील महत्त्वाच्या कामांचा समावेश करण्याची मागणी आमदार डॉ. किरण लहामटे यांनी केली आहे. त्यांनी नाशिक-त्र्यंबकेश्वर कुंभमेळा प्राधिकरणाचे आयुक्त शेखर सिंह यांची भेट घेऊन ही मागणी मांडली. यावर आयुक्तांनी सकारात्मक प्रतिसाद देत आवश्यक कार्यवाही करण्याचे आश्वासन दिले आहे.

कुंभमेळा विकासकामांमध्ये अकोल्यातील धार्मिक, पर्यटन व दळणवळणाच्या कामांचा समावेश करावा, अशी मागणी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या शिफारशीसह करण्यात आली आहे. यात प्रवरा तिरी घाट विकास, सिन्नर हद्द ते अगस्ती ऋषी आश्रम रस्ता व पूल, विद्युतीकरण तसेच आश्रम परिसराचे सुशोभीकरण, शेंडी-पांजरे-उददावणे-रतनगड (पायथा)-अमृतेश्वर मंदिर रस्ता व पूल, आणि मंदिर परिसराचे सुशोभीकरण या कामांचा समावेश आहे. यासोबतच राजूर-पाचनई-



हरिश्चंद्रगड (पायथा) रस्ता, देवठाण-समशेरपूर-केळी-रुम्हणवाडी रस्ता व पूल, त्र्यंबकेश्वर-घोटी-राजूर-कोतूळ-ब्राह्मणवाडा-ओतूर-भीमाशंकर हा महत्त्वपूर्ण मार्ग आणि बारी घाट परिसरातील रस्ता विकासाची मागणी करण्यात आली आहे. या सर्व कामांमुळे अकोले तालुक्यातील धार्मिक व निसर्ग पर्यटन तसेच दळणवळण व्यवस्थेला मोठी चालना मिळणार आहे. अकोले तालुक्याच्या सर्वांगीण विकासासाठी कटिबद्ध असून विकासाचा हा प्रवास असाच अविरत सुरू राहील, असा विश्वास आमदार डॉ. किरण लहामटे यांनी व्यक्त केला.

# महाराष्ट्रात आजपासून दूध महागले

मुंबई (वृत्तसंस्था)

महागाईने त्रस्त असलेल्या सर्वसामान्यांच्या घरगुती बजेटवर आणखी एक भार पडला आहे. महाराष्ट्रात आज, ११ ऑगस्ट २०२६ पासून गायीच्या आणि म्हशीच्या दुधाच्या दरात प्रतिलिटर २ रुपयांनी वाढ झाली आहे. त्यामुळे गायीचे दूध ६० रुपयांवरून ६२ रुपये, तर म्हशीचे दूध ७६ रुपयांवरून ७८ रुपये प्रतिलिटर झाले आहे. दूध उत्पादक आणि दूध प्रक्रिया उद्योगाच्या कल्याणासाठी काम करणाऱ्या संघटनेच्या बैठकीत हा निर्णय घेण्यात आला. दुधाच्या दरवाढीचा परिणाम केवळ पिशवीतील दूध खरेदीवर होणार नसून दही, ताक, लोणी, पनीर, चीज, तूप, फ्लेवर्ड मिल्क आणि दुधापासून तयार होणाऱ्या मिठाईच्या किमतींवरही होण्याची शक्यता आहे. या दुग्धजन्य पदार्थांच्या दरात सुमारे १० टक्क्यांपर्यंत वाढ होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे.

नव्या दरांनुसार गायीच्या दुधासाठी आता ग्राहकांना प्रतिलिटर ६२ रुपये मोजावे लागतील. यापूर्वी हा दर ६० रुपये होता. त्याचप्रमाणे म्हशीच्या दुधाचा दर ७६ रुपयांवरून ७८ रुपये प्रतिलिटर करण्यात आला आहे. ही दरवाढ ११ ऑगस्टपासून राज्यभर लागू करण्यात आली आहे.

# नाशिक भूकंपाच्या धक्क्यांनी हादरले

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक - नाशिक शहर आणि जिल्ह्यात अनेक भागात भूकंपाचे धक्के जाणवले आहेत. या भूकंपाचे केंद्र नाशिक शहरापासून ५३ किलोमीटर अंतरावर असल्याचं समोर आलं आहे. भूकंपाची तीव्रता ४.३ रिश्टर स्केल असल्याची माहिती समोर आली आहे. ग्रामीण भागात केंद्रबिंदू असणाऱ्या या भूकंपाचे हादरे नाशिक शहरात ही जाणवले आहेत. नाशिक जिल्ह्याती सुरगाणा, दिंडोरी, सप्तश्रृंगी गड, पेठ या ग्रामीण भाग सोबतच नाशिक शहारत अनेक भागात धक्के जाणवल्याची माहिती स्थानिकांकडून देण्यात आली आहे. पेठ, दिंडोरी, कळवण, चांदवड, देवळा, नाशिक या तालुक्यात भूकंपाचे धक्के जाणवले.

नाशिक जिल्ह्यातील ग्रामीण भागासह नाशिक शहरातील अनेक भागांमध्ये भूकंपांचे धक्के जाणवले आहे, यामुळं नाशिककरांमध्ये घबराट दिसून आली आहे. गेल्या आठवड्याभरापासून नाशिकच्या ग्रामीण भागांमध्ये भूकंपाचे धक्के जाणवत आहेत. नाशिक जिल्ह्यात व तालुक्यात भूकंपाचे धक्के जाणवल्याच्या पार्श्वभूमीवर नागरिकांना जिल्हा प्रशासनाकडून सर्व नागरिकांनी सतर्क राहावे आणि सुरक्षिततेची काळजी घ्यावी, असं आवाहन करण्यात आलं आहे. नागरिकांनी भूकंपाचे धक्के जाणवत असताना घरात असल्यास खिडक्या, काचा, कपाटे व जड वस्तूंपासून दूर राहावे. शक्य असल्यास मजबूत टेबलाखाली आसरा घ्यावा. भूकंपाचे धक्के सुरू असताना लिफ्टचा वापर करू नये व धावत बाहेर पडण्याचा प्रयत्न करू नये. धक्के थांबल्यानंतर इमारतीपासून सुरक्षित अंतरावर मोकळ्या जागेत जावे. विजेच्या तारा, झाडे व धोकादायक बांधकामांपासून दूर राहावे. अफवा किंवा अप्रमाणित माहिती पसरवू नये. प्रशासनाकडून मिळणाऱ्या अधिकृत सूचनांचे पालन करावे.

# नाशिक कुंभमेळ्याच्या कामांच्या नावावर फसवणूक; १२ बनावट वर्क ऑर्डर उघड

युवावार्ता (प्रतिनिधी)

नाशिक -नाशिक येथे होत असलेल्या आगामी कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर सुमारे ५०० कोटी रुपयांच्या कंत्राटाचे बनावट कार्यादेश (वर्क ऑर्डर) देऊन आर्थिक फसवणूक करणारे रॅकेट समोर आले आहे. या प्रकरणांत जामनेरमधील दोघांसह जळगाव आणि धुळे जिल्ह्यातील प्रत्येकी एकाचा सहभाग असल्याची माहिती कुंभमेळामंत्री गिरीश महाजन यांनी पत्रकार परिषदेत दिली. या टोळीने छत्रपती संभाजीनगरसह मुंबईतील मोठ्या कंत्राटदारांनाही बनावट कार्यादेश देऊन आर्थिक गंडा घातल्याची बाब पुढे आली आहे.

कुंभमेळ्यासाठी निविदा प्रक्रिया ऑनलाइन पद्धतीने सुरू आहे. मात्र, काही निविदांची प्रक्रिया ऑफलाइन पद्धतीने सुरू असल्याचे सांगत गंडविणारे एक रॅकेट, सक्रिय आहे. या रॅकेटने बनावट कार्यादेश गे तयार करून अनेकांना गंडा घातला आहे. विभागीय व्य आयुक्त डॉ. प्रवीण गेडाम यांच्या नावानिशी काही कंत्राटांचे कार्यादेश दिल्याचे समोर आले आहे.

अधिकाऱ्यांच्या वैयक्तिक नावाने अशा प्रकारचे कार्यादेश जारी केले जात नाहीत, तसेच संबंधित बनावट कार्यादेशांवर अधिकृत 'क्यूआर कोड'देखील नसल्याचे महाजन यांनी स्पष्ट केले. आतापर्यंत अशा प्रकारचे बारा बनावट कार्यादेश प्राप्त झाले असून, या प्रकरणाची गंभीर दखल घेत नाशिक पोलिस आयुक्तांना तातडीने गुन्हा दाखल करण्याचे निर्देश दिल्याचे त्यांनी सांगितले.

या रॅकेटमध्ये जामनेरमधील दोघांसह जळगाव आण्णि धुळे जिल्ह्यातील प्रत्येकी एकाचा समावेश आहे. या टोळीने कुंभमेळ्याच्या कामासाठी पोलिसांना जेवण, पाण्याच्या बाटल्या, बॅरिकेड्स, तसेच अन्य साहित्य पुरविण्याच्या नावाखाली काही व्यक्ती व कंत्राटदारांना कार्यादेशांच्या प्रती दिल्या.

## पान १ वरून अवैध दारू विक्रीवर कठोर कारवाईची ...

अशी भूमिका समितीने मांडली आहे. कारवाई न झाल्यास आंदोलनाचा इशारा- संगमनेर शहर व तालुक्यातील अवैध दारू विक्रीला आळा घालण्यासाठी प्रशासनाने ठोस पावले उचलली नाहीत, तर नागरिकांना सोबत घेऊन रस्त्यावर उतरून तीव्र आंदोलन करण्यात येईल, असा इशारा दारूबंदी कृती समितीचे जिल्हाध्यक्ष अमर कतारी यांनी दिला आहे. समितीच्या प्रमुख मागण्यांमध्ये अवैध व बनावट दारू विक्रेत्यांवर कठोर कायदेशीर कारवाई, बनावट दारू आढळलेल्या बार किंवा दुकानाचा परवाना नियमानुसार रद्द करून आस्थापना सील करणे, जप्त दारूचे अधिकृत प्रयोगशाळेत परीक्षण करणे, विशेष धडक मोहीम राबविणे, तसेच कारवाई झालेल्या ठिकाणी पुन्हा अवैध विक्री सुरू होणार नाही यासाठी नियमित तपासणी करण्याचा समावेश आहे. या मागण्यांवर अमर कतारी (जिल्हाध्यक्ष), रंगनाथ फटांगरे (तालुकाध्यक्ष), संभव लोढा (शहराध्यक्ष) आणि सचिन साळवे (जिल्हा सरचिटणीस) यांनी भूमिका मांडली.

# राज्यातील शेतकऱ्यांना लवकरच दिवसा मोफत वीज मिळणार - मुख्यमंत्री फडणवीस

मुंबई (वृत्तसंस्था)

शेतकऱ्यांना दिलेले वचन पूर्ण करत राज्य शासनाने आतापर्यंतची सर्वात मोठी कर्जमाफी दिली असून, यापुढे प्रत्येक शेतकऱ्याला थकबाकी नसल्याचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे. शेतकऱ्यांना दिवसा वीज उपलब्ध करून देण्यासाठी सौर कृषी वाहिनी योजनेला गती देण्यात आली असून, सध्या ७४ टक्के शेतकऱ्यांना दिवसा वीज मिळत आहे. यावर्षाअखेर ९० टक्के आणि पुढील वर्षी १०० टक्के शेतकऱ्यांना दिवसा मोफत वीज उपलब्ध करून देण्याचे उद्दिष्ट असल्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी सांगितले.



विविध कागल नगरीत विकासकामांच्या लोकार्पण सोहळ्याप्रसंगी आयोजित शेतकरी मेळाव्यात मुख्यमंत्री फडणवीस बोलत होते. यावेळी कागल नगरपरिषदेच्या वतीने हिंदूराव घाटगे विद्यालयाच्या जीर्णोद्धार कामाचा लोकार्पण सोहळा तसेच लोकराजा राजर्षी छत्रपती शाहू महाराज यांच्या पूर्णाकृती पुतळ्याचे अनावरण मुख्यमंत्री फडणवीस यांच्या हस्ते करण्यात आले. कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानी उपमुख्यमंत्री सुनेत्रा अजित पवार होत्या.मुख्यमंत्री फडणवीस म्हणाले, राजर्षी शाहू महाराजांनी सामाजिक, आर्थिक आणि शैक्षणिक क्रांतीच्या माध्यमातून बहुजन समाजासाठी शिक्षण आणि रोजगाराची दारे खुली केली. १९४२ च्या 'भारत छोडो' आंदोलनाच्या क्रांतिकारी पर्वाच्या स्मरणदिनी अशा थोर समाजसुधारकाच्या पुतळ्याचे अनावरण करण्याचे भाग्य मिळणे ही आपल्यासाठी विशेष बाब आहे. राजर्षी शाहू महाराजांनी आपल्या काळातील चुकीची सामाजिक व्यवस्था झुगारून नवी सामाजिक व्यवस्था निर्माण केली.

# १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर वाढण्याचा हवामान विभागाचा अंदाज

मुंबई (वृत्तसंस्था)

महाराष्ट्रात गेल्या काही दिवसांपासून पावसाने काहीशी विश्रांती घेतली असली, तरी आता पुन्हा एकदा वातावरणात मोठा बदल होत आहे. येत्या २४ तासांत बंगालच्या उपसागरात कमी दाबाचे क्षेत्र निर्माण होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे. यामुळे राज्यात मान्सून पुन्हा सक्रिय होणार असून, १३ ऑगस्टपासून पावसाचा जोर प्रचंड वाढण्याची शक्यता आहे. विशेषतः कोकण, मुंबई आणि मध्य महाराष्ट्रातील घाटमाथ्याला याचा सर्वाधिक प्रभाव जाणवू शकतो.मुंबई प्रादेशिक हवामान केंद्राने जारी केलेल्या अंदाजानुसार, ९ ते १२ ऑगस्ट दरम्यान उत्तर व दक्षिण कोकणात बहुतांश ठिकाणी पावसाच्या जोरदार सरी कोसळतील. मध्य महाराष्ट्रात काही ठिकाणी पाऊस अपेक्षित असून, घाटमाथ्यावर पावसाची तीव्रता वाढणार आहे. तसेच, मराठवाडा आणि विदर्भात विखुरलेल्या ठिकाणी हलका ते मध्यम स्वरूपाचा पाऊस आणि मेघगर्जना होण्याची शक्यता वर्तवण्यात आली आहे.

मलबार हिलच्या डोंगर उताराला मिळणार मजबूत हवामान विभागाच्या 'इम्पॅक्ट-बेस्ड फोरकास्ट'नुसार मुसळधार पावसामुळे सखल भागात पाणी साचणे, स्थानिक पूरपरिस्थिती निर्माण होणे, तसेच झाडे आणि जुन्या इमारती कोसळण्याच्या घटना घडण्याची शक्यता आहे. विशेषतः घाट परिसरात भूस्खलन आणि दरडी कोसळण्याचा धोका असल्याने हवामान विभागाने नागरिकांना सतर्क राहण्याचे आवाहन केले आहे.राज्यात यंदा समाधानकारक पाऊस झाला असून, आजपर्यंत ६३७.१ मिमी पावसाची नोंद झाली आहे (सरासरी ६२२.७ मिमी), जो सरासरीच्या तुलनेत २ टक्के जास्त आहे. ऑगस्टच्या पहिल्या आठवड्यात पावसाने उघडीप दिल्याने विदर्भ व मराठवाड्यात सरासरीपेक्षा काहीसा कमी पाऊस झाला असून, हिंगोली जिल्ह्यात सर्वात कमी पावसाची नोंद झाली आहे.

# पोल्ट्री शेडवर कारवाई न झाल्यास १४ ऑगस्टपासून आमरण उपोषणाचा इशारा, नागरीकांचे आरोग्य धोक्यात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर तालुक्यातील मांडवे-बिरेवाडी गावांच्या शिवेवर नियमांचे उल्लंघन करून पोल्ट्री शेड सुरू असल्याचा आरोप करत, संबंधित शेडची तातडीने शासकीय अधिकाऱ्यांमार्फत संयुक्त पाहणी व मोजणी करून दोषींवर कायदेशीर कारवाई करावी, अशी मागणी बिरेवाडी येथील रहिवासी संतोष माणिक गळंगे यांनी केली आहे. प्रशासनाने कारवाई न केल्यास १४ ऑगस्ट रोजी सकाळी १० वाजता बिरेवाडी ग्रामपंचायत कार्यालयासमोर आमरण उपोषणास बसण्याचा इशारा त्यांनी निवेदनाद्वारे दिला आहे.

गळंगे यांनी ग्रामपंचायतीसह संबंधित प्रशासनाकडे दिलेल्या निवेदनात म्हटले आहे की, त्यांच्या घराच्या परिसरात तीन पोल्ट्री शेड सुरू आहेत. या शेडमुळे परिसरात अस्वच्छता, दुर्गंधी आणि माशांचा मोठ्या प्रमाणात उपद्रव होत असल्याचा आरोप त्यांनी केला आहे. तसेच मृत कोंबड्यांची योग्य विल्हेवाट लावली जात नसल्याने भटक्या कुत्र्यांचा उपद्रवही वाढल्याचे त्यांनी निवेदनात नमूद केले आहे.

पोल्ट्री शेडमधील सांडपाणी तसेच कोंबड्यांच्या विष्ठेच्या व्यवस्थापनासाठी आवश्यक शोषखड्डे नसल्याचा, तसेच परिसरात आवश्यक पक्के काँक्रीटीकरण करण्यात आलेले नसल्याचा आरोपही गळंगे यांनी केला आहे. त्यामुळे दुर्गंधी व अस्वच्छतेचा प्रश्न निर्माण होऊन नागरिकांच्या आरोग्याला धोका निर्माण होत असल्याचे त्यांनी म्हटले आहे.

तिन्ही पोल्ट्री शेडची शासकीय अधिकाऱ्यांमार्फत संयुक्त पाहणी करून प्रत्यक्ष मोजणी करावी, तसेच संबंधित शेडमध्ये शासनाच्या नियमांचे पालन होत आहे की नाही, याची तपासणी करावी, अशी मागणी त्यांनी केली आहे. तपासणीत नियमांचे उल्लंघन अथवा अनधिकृत बांधकाम आढळल्यास संबंधित पोल्ट्री शेडवर कायदेशीर कारवाई करून ते कायमस्वरूपी बंद करण्यात यावेत, अशी मागणीही निवेदनातून करण्यात आली आहे.

गळंगे यांच्या निवेदनानुसार, यापूर्वीही प्रशासनाकडे वारंवार निवेदने देऊन संबंधित पोल्ट्री शेडची पाहणी व कारवाई करण्याची मागणी करण्यात आली होती. मात्र, अद्याप प्रत्यक्ष पाहणी किंवा ठोस कारवाई झालेली नसल्याचा आरोप त्यांनी केला आहे.

गळंगे यांचे बंधू भारतीय सैन्यात कार्यरत असून त्यांचे कुटुंबीयही याच परिसरात वास्तव्यास आहेत. त्यामुळे त्यांच्या कुटुंबासह परिसरातील नागरिकांच्या आरोग्य व सुरक्षिततेचा प्रश्न प्रशासनाने गांभीर्याने घ्यावा, अशी मागणी त्यांनी केली आहे.

दरम्यान, प्रशासनाकडून तातडीने पाहणी करून कायदेशीर कारवाई न झाल्यास १४ ऑगस्टपासून आमरण उपोषण सुरू करण्यात येईल आणि मागण्यांवर प्रत्यक्ष कारवाई होईपर्यंत उपोषण मागे घेणार नाही, असा स्पष्ट इशारा संतोष गळंगे यांनी दिला आहे. निवेदनाच्या प्रती शासन, प्रशासन तसेच संबंधित विभागांच्या अधिकाऱ्यांना देण्यात आल्याचे त्यांनी सांगितले.


## ग्रामपंचायत कोहकडी, ता. पारनेर, जि. अहिल्यानगर ब –१ निविदा नोटीस

सरपंच/ ग्रामपंचायत अधिकारी ग्रा.पं. कोहकडी, ता. पारनेर जि. अहिल्यानगर यांचेकडून खालील कामांचे जिल्हा परिषद अहिल्यानगर सा. बा. विभाग यांचे कडील नोंदणीकृत सीलबंद ब १ दोन कंत्राटदाराकडून लिफाफा पद्धतीने ब १ निविदा मागविण्यात येत आहे.

| अ. क्रं. | कामाचे नाव | योजना | निविदा विक्री | बयाणा रक्कम | निविदा रक्कम | कामाची मुदत | वर्गवारी |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १. | मौजे कोहकडी येथे ग्रामपंचायत सुशोभीकरण करणे | १५ वा वित्त आयोग | २३६/- | -- | २६१२८२/- | ६ महिने | सु. बे. |

निविदा फॉर्म व कामाच्या शर्ती व अटीबाबतची माहिती ग्रामपंचायत **कोहकडी** कार्यालयात **दि. १२/०८/२०२६ ते दि. १८/०८/२०२६** या कालावधीत कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून) मिळतील. सीलबंद निविदा **दि. १८/०८/२०२६** रोजी ०५.०० वाजेपर्यंत स्वीकारणेत येतील. त्याबाबत अटी शर्ती बाबत माहिती ग्रा. पं. **कोहकडी** येथे उपलब्ध आहे. निविदा स्वीकारण्याचा अगर नाकारण्याचा अधिकार सरपंच/ग्रामपंचायत अधिकारी **कोहकडी** यांनी राखून ठेवला आहे. निविदा उघडण्याची प्रक्रिया **दि. १९/०८/२०२६** रोजी सकाळी ठीक १०.०० वाजता ग्रामपंचायत **कोहकडी** ता. पारनेर जि. अ.नगर येथे पार पडेल. निविदा फॉर्म सोबत १) नोंदणी प्रमाणपत्र २) जीएसटी नंबर ३) पॅनकार्ड ४) आयकर विवरण ५) ब १ निविदा फॉर्म ६) बंधपत्र १०० स्टॅम्प पेपर वर ७) कामाचे अनुभव दाखले (सु. बे. साठी सुरूवातीचे ३ वर्षापर्यंत कामाचे अनुभव दाखले साठी सुट राहील. नवीन नोंदणी असले बाबतचे प्रतिज्ञापत्र १०० च्या स्टॅम्प पेपर वर जोडणे आवश्यक राहील) ८) बयाणा रक्कम (सुबेसाठी प्रमाणपत्रावर सुटचा उल्लेख असणे गरजेचे आहे ) व निविदा फी भरलेली पावती (सामान्य पावती) व आवश्यक कागदपत्रे जोडावीत.

**ग्रामपंचायत अधिकारी**
**ग्रा.पं. कोहकडी, ता. पारनेर, जि. अ.नगर**

**सरपंच**
**ग्रा. पं. कोहकडी, ता. पारनेर, जि. अ.नगर**

शेतकऱ्यांचा श्वास ! ग्राहकांचा विश्वास !!
राजहंस
दर्जेदार राजहंस दूध व दूधजन्य पदार्थ
संगमनेर तालुका सह. दूध उत्पा. व प्रक्रिया संघ मर्या.
अमृतनगर (घुलेवाडी), ता. संगमनेर, जि. अहमदनगर
(०२४२५) २२५४१०, २२५५१०, २२६१६१, २२६१६२
www.rajhansmilk.com rajhansmilk@gmail.com

संगमनेरकरांनी गौरविलेले
।।जय श्रीराम।।
सुपर शॉपी
निवडक किराणा, ड्रायफुट, कॉस्मेटिक
जीवन ज्योती, गणेशनगर, संगमनेर
एस. आर. थोरात दुध व बाय प्रोडक्टस्
प्रोप्रा. अशोक रा. जाधव
फोन (०२४२५) २२१७८८,२२३६२९, मोबा. ९८२२४२५५२२
क्रेडीट कार्ड व डेबिट कार्ड वापरण्याची सुविधा

धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल
We treat He cure's
डॉ. प्रविणकुमार पानसरे मो. ९८२२३९७५७४
डॉ. दिपाली पानसरे मो. ७४९९१७६८६४
उपलब्ध सुविधा
मेडिसीन विभाग, सर्जरी विभाग, अस्थिरोग विभाग, सुपर स्पेशालिटी सुविधा,स्त्रीरोग विभाग, न्युरो सर्जरी, प्लास्टिक सर्जरी, युरो सर्जरी, कॅन्सर सर्जरी
महात्मा ज्योतिबा फुले जन आरोग्य योजनेअंतर्गत
डायलेसिस सुविधा उपलब्ध
या योजनेअंतर्गत येणाऱ्या ऑपरेशनचा लाभ घेण्यासाठी आपले ओरिजनल आधार कार्ड व रेशनकार्ड असणे गरजेचे आहे
धन्वंतरी मल्टिस्पेशालिटी हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर, जि. अ.नगर, फोन (०२४२५) २२७५७४, २२७५७५

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# जिल्हास्तरीय धरणे आंदोलनाची हाक

## १७ ऑगस्टला अहिल्यानगरात कामगार एकवटणार

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - भारतीय मजदूर संघ, जिल्हा अहिल्यानगर यांच्या वतीने १७ ऑगस्ट २०२६ रोजी जिल्हाधिकारी कार्यालय, अहिल्यानगर येथे जिल्हास्तरीय धरणे आंदोलन आयोजित करण्यात आले आहे. हे आंदोलन देशव्यापी स्वरूपात करण्यात येणार असून, यावेळी भारतीय मजदूर संघाचे प्रदेश महामंत्री किरण मिलगीर उपस्थित राहणार आहेत. जिल्ह्यातील कामगारांनी मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन महाराष्ट्र वीज कामगार महासंघाचे संगमनेर विभागीय सचिव अमोल आभाळे यांनी केले आहे.

केंद्र सरकारकडे कामगारांच्या विविध प्रलंबित मागण्यांकडे लक्ष वेधण्यासाठी हे आंदोलन करण्यात येणार आहे. आंदोलनाद्वारे ईएसआयसी वेतन मर्यादा २१ हजार रुपयांवरून ४२ हजार रुपये करणे, ईपीएफअंतर्गत किमान पेन्शन ९ हजार रुपयांवरून ९ हजार ५०० रुपये प्रतिमहिना करणे, ईपीएफ वेतन मर्यादा १५ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये करणे, आदी मागण्या करण्यात येणार आहेत. तसेच बोनस गणनेसाठी वेतन मर्यादा ६ हजार रुपयांवरून ३० हजार रुपये, तर बोनस पात्रतेची वेतन मर्यादा २१ हजार रुपयांवरून ४२ हजार रुपये करण्याची मागणी करण्यात आली आहे. विविध योजनांमध्ये कार्यरत कामगारांचे मानधन भरघोस प्रमाणात वाढवावे, अशीही मागणी आहे.

कंत्राटी व आउटसोर्सिंग कामगारांना 'समान काम-समान वेतन' या तत्त्वाची प्रभावी अंमलबजावणी करावी, श्रमसंहितांमधील कामगारविरोधी तरतुदी रद्द अथवा आवश्यक सुधारणा कराव्यात, बँक कर्मचाऱ्यांसाठी आठवड्यातील पाच दिवसांचा कामकाजाचा नियम तातडीने लागू करावा, अशा मागण्याही आंदोलनाच्या माध्यमातून मांडण्यात येणार आहेत.

याशिवाय ग्रॅच्युइटीची कमाल मर्यादा २० लाख रुपयांवरून ४० लाख रुपयांपर्यंत वाढवावी, तसेच सर्व पात्र कामगारांना ग्रॅच्युइटीचा लाभ सुनिश्चित करावा आणि देशातील सर्व कामगारांसाठी किमान वेतन ३० हजार रुपये प्रतिमहिना निश्चित करावे, अशी मागणी करण्यात आली आहे.

भारतीय मजदूर संघाने जिल्ह्यातील सर्व कामगार बंधू-भगिनींना आपल्या हक्कांच्या लढ्यासाठी मोठ्या संख्येने उपस्थित राहून आंदोलन यशस्वी करण्याचे आवाहन केले आहे. कामगारांच्या हक्कांसाठी एकजूट होऊया. जिल्हास्तरीय धरणे आंदोलनात मोठ्या संख्येने सहभागी व्हावे, असे आवाहन भारतीय मजदूर संघाचे जिल्हाध्यक्ष सुजित उदरभरे, सचिव कृष्णा साठे, कंत्राटी कामगार महासंघाचे प्रदेश उपाध्यक्ष सचिन पाटील, राज्य शासकीय कर्मचारी महासंघाचे सुनील मुंगसे आणि महाराष्ट्र वीज कामगार संघाचे जिल्हा सचिव गणेश कुंभारे यांनी केले आहे.

# संगमनेरच्या मानाच्या पहिल्या गणपतीच्या अध्यक्षपदी रोशन आमले



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - शेकडो वर्षांची ऐतिहासिक व सांस्कृतिक परंपरा लाभलेल्या संगमनेरच्या मानाचा पहिला गणपती श्री सोमेश्वर रंगारगल्ली मित्र मंडळाच्या गणेशोत्सव २०२६ च्या अध्यक्षपदी रोशन आमले यांची सर्वानुमते निवड करण्यात आली.

दि. ०८ ऑगस्ट २०२६ रोजी श्री लक्ष्मीनारायण मंदिर, रंगारगल्ली येथे मंडळाची बैठक संपन्न झाली. या बैठकीत गणेशोत्सव २०२६ च्या नियोजनाबाबत सविस्तर चर्चा करून मंडळाच्या विविध पदाधिकाऱ्यांची निवड करण्यात आली. यावेळी मंडळाचे सर्वे मार्गदर्शक मान्यवर उपस्थित होते.

बैठकीत अध्यक्षपदी रोशन आमले, कार्याध्यक्षपदी अभिजीत पाटणकर उपाध्यक्षपदी संकेत काजळे व ऋषिकेश पवार, सचिवपदी - अक्षय ढोरे, सहसचिवपदी प्रथमेश गरुडकर , खजिनदारपदी देवेंद्र काळे व कैलास बुरसे व प्रकल्पप्रमुख अमोल डुकरे व कुंजल कांबळे,यांच्यावर जबाबदारी सोपविण्यात आली. याशिवाय मिरवणूक प्रमुख , शुभम आमले / योगेश काजळे या पदाधिकाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली. यंदाचा गणेशोत्सव परंपरा, संस्कृती आणि सामाजिक बांधिलकी जपत अधिक भव्य, शिस्तबद्ध व भक्तिमय वातावरणात साजरा करण्याचा निर्धार यावेळी करण्यात

# जिल्ह्यात १२ सप्टेंबरला राष्ट्रीय लोकअदालत

युवावार्ता (प्रतिनिधी)

अहिल्यानगर - राष्ट्रीय विधी सेवा प्राधिकरण, सर्वोच्च न्यायालय नवी दिल्ली यांच्या निर्देशाप्रमाणे आपापसातील वाद समझोत्याने मिटविण्यासाठी राष्ट्रीय लोकअदालतीचे आयोजन शनिवार १२ सप्टेंबर २०२६ रोजी अहिल्यानगर जिल्ह्यातील प्रत्येक न्यायालयात करण्यात आलेले आहे. या राष्ट्रीय लोकअदलातीमध्ये मोटार वाहन अपघात प्रकरणे, कौटुंबिक प्रकरणे, वीज वितरण कंपनीचे प्रकरणे, दिवाणी प्रकरणे, तडजोडपात्र फौजदारी प्रकरणे तसेच बँक व वीज वितरण कंपनीचे दाखल पूर्व प्रकरणे तडजोडीसाठी ठेवण्यात आली आहेत. त्याचप्रमाणे कौटुंबिक न्यायालय, औद्योगिक न्यायालय, कामगार न्यायालय, सहकार न्यायालय व ग्राहक तक्रार निवारण मंचाचे प्रकरणे लोक अदालतमध्ये तडजोडीसाठी ठेवण्यात आलेले आहेत.

लोक अदालतीमध्ये प्रकरण मिटवल्यास कोर्ट फी परत मिळते. ज्या नागरिकांना आपली प्रकरणे लोकन्यायालयात ठेवायचे असतील त्यांनी संबंधित न्यायालयात किंवा अहिल्यानगर न्यायालयातील जिल्हा विधी सेवा प्राधिकरण तसेच तालुका विधी सेवा समिती येथे संपर्क साधावा. तसेच आपले प्रकरणे लोकन्यायालयात ठेवायची असल्यास आपण खालील क्रमांकावर संपर्क साधू शकता.

संपर्क क्रमांक ८५९१ ९०३६१६ तसेच वश्रीरपरसरीसारळश्र.लो यावर ईमेल करू शकता- लोकन्यायालयामध्ये प्रकरण ठेवण्यासाठी प्रलंबित प्रकरणांमध्ये पक्षकार त्यांच्या वकिलांशी देखील संपर्क साधू शकता. राष्ट्रीय लोकअदालतीचा जास्तीत जास्त पक्षकारांनी लाभ घ्यावा असे आवाहन प्रमुख जिल्हा व सत्र न्यायाधीश तथा अध्यक्ष, जिल्हा विधी सेवा प्राधिकरण शिवाजी भ. कचरे, व सचिव, योगेश पैठणकर यांनी केले आहे.

# विज्ञानाचा लख्ख प्रकाश तळागाळापर्यंत; 'एम्पॉवरिंग टुमारो'ची कार्यशाळा



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर : शालेय विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, तर्कशुद्ध विचारसरणी आणि पर्यावरण संवर्धनाची जाणीव निर्माण करण्याच्या उद्देशाने कार्यरत असलेल्या 'एम्पॉवरिंग टुमारो' संस्थेने अमृतवाहिनी मॉडेल स्कूल येथे आपल्या १००व्या कार्यशाळेचा महत्त्वपूर्ण टप्पा पूर्ण केला. या उपक्रमातून आतापर्यंत ५ हजारांहून अधिक विद्यार्थ्यांपर्यंत विज्ञान व पर्यावरणविषयक ज्ञान पोहोचविण्यात संस्थेला यश आले आहे. देशातील आणि जगातील नामांकित शैक्षणिक संस्थांमधून मिळविलेले ज्ञान समाजातील तळागाळातील विद्यार्थ्यांपर्यंत पोहोचावे, या उद्देशाने 'एम्पॉवरिंग टुमारो'ची स्थापना करण्यात आली आहे. आयआयटी बॉम्बेचे माजी संशोधक व अमेरिकेतून पीएचडी प्राप्त डॉ. अनिशकुमार सोमन हे संस्थेचे संस्थापक आहेत. तर आयआयटी मंडीचे माजी विद्यार्थी व आयआयटी गांधीनगरचे माजी संशोधक ऋषिकेश जाधव हे सह-संस्थापक म्हणून कार्यरत आहेत. संस्थेच्या कार्यशाळांमध्ये विद्यार्थ्यांना केवळ पाठ्यपुस्तकातील ज्ञान देण्याऐवजी प्रत्यक्ष प्रयोग व 'हँड्स-ऑन' अनुभवातून विज्ञान समजावून सांगण्यावर भर दिला जातो. विज्ञानातील एखादी संकल्पना पाठांतर करण्यापेक्षा 'हे असे का घडते?' असा प्रश्न विद्यार्थ्यांनी विचारावा, जिज्ञासा वाढावी आणि प्रत्येक गोष्टीमागील वैज्ञानिक कारण समजून घेण्याची सवय लागावी, यासाठी विविध प्रयोग व उपक्रम घेतले जातात.

'स्कूल आउटरिच प्रोग्राम्स'च्या माध्यमातून विद्यार्थ्यांना पर्यावरण संवर्धन आणि शाश्वत विकासाचे महत्त्व समजावून सांगितले जाते. विज्ञान आणि निसर्ग यांचा परस्पर संबंध सोप्या भाषेत आणि प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसमोर मांडला जातो.

शिक्षणाचे वाढते बाजारीकरण लक्षात घेता, तळागाळातील विद्यार्थ्यांना दर्जेदार वैज्ञानिक व तंत्रज्ञानविषयक ज्ञान सहज उपलब्ध व्हावे, हा संस्थेचा प्रमुख उद्देश आहे. उच्च शिक्षण आणि विज्ञान-तंत्रज्ञानाचे ज्ञान हे केवळ ठराविक वर्गापुरते मर्यादित न राहता प्रत्येक विद्यार्थ्यापर्यंत विनाअडथळा पोहोचावे, या ध्येयाने संस्था कार्यरत आहे. शिक्षण क्षेत्रात प्रत्यक्ष आणि सकारात्मक बदल घडवून आणण्याची इच्छा असलेल्या व्यक्तींनाही या उपक्रमाशी जोडून घेण्याचे आवाहन संस्थेने केले आहे.

# फार्मसी विद्यार्थ्यांसाठी उद्योग-सहकार्याचा करार



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - विद्यार्थ्यांना गुणवत्तापूर्ण औद्योगिक प्रशिक्षण, संशोधनाच्या संधी, कौशल्य विकास आणि रोजगाराभिमुख शिक्षण उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने श्री स्वामी समर्थ इन्स्टिट्यूट माळवाडी (बोटा) येथील फार्मसी महाविद्यालय आणि जेनोम बायोटेक प्रा. लि., सिन्नर, नाशिक यांच्यात सामंजस्य करार (चेण) करण्यात आला. जेनोम बायोटेक ही नाशिक जिल्ह्यातील औषधनिर्मिती क्षेत्रातील एक स्थापित कंपनी असून विविध औषध उत्पादने आणि निर्यातीसाठी ओळखली जाते.

या सामंजस्य करारामुळे विद्यार्थ्यांना औद्योगिक भेटी, इंटर्नशिप, औद्योगिक प्रशिक्षण, तज्ज्ञांचे मार्गदर्शन, कौशल्य विकास कार्यशाळा, संशोधन सहकार्य, प्रकल्प मार्गदर्शन तसेच प्लेसमेंटच्या संधी उपलब्ध होणार आहेत. उद्योग आणि शिक्षण यांच्यातील दुवा अधिक सक्षम करण्यासाठी हा करार महत्त्वपूर्ण ठरणार आहे. यावेळी संस्थेचे अध्यक्ष डॉ. शिवाजीराव पोखरकर यांनी सांगितले की, विद्यार्थ्यांना उद्योगविश्वाच्या गरजांनुसार सक्षम आणि रोजगारक्षम बनविण्यासाठी अशा उद्योग-सहकार्याची आवश्यकता आहे. हा करार विद्यार्थ्यांच्या सर्वांगीण विकासासाठी निश्चितच उपयुक्त ठरेल. संस्थेचे सचिव डॉ. अमित पोखरकर यांनी सांगितले की, फार्मसी शिक्षणात उद्योगाभिमुखता वाढविणे हे संस्थेचे प्रमुख ध्येय असून अशा सामंजस्य करारांमुळे विद्यार्थ्यांना प्रत्यक्ष औद्योगिक अनुभव आणि करिअरच्या अधिक संधी उपलब्ध होतील. महाविद्यालयाचे ट्रेनिंग आणि प्लेसमेंट प्रमुख प्रा. सचिन वाकचौरे यांनी या करारामुळे विद्यार्थ्यांना आधुनिक औषध उद्योगातील कार्यपद्धती, गुणवत्ता नियंत्रण, गुणवत्ता हमी, उत्पादन प्रक्रिया आणि संशोधन क्षेत्राची प्रत्यक्ष माहिती मिळेल, असा विश्वास व्यक्त केला.

पान १ वरून -

# रेल्वेसाठी महामार्गावर चक्काजाम...

जाण्यासाठी प्रतिबंध करुन, जिल्हाधिकाऱ्यांच्या प्रतिबंधक आदेशाचे उल्लंघन करण्यात आले. यामुळे आंदोलन करणाऱ्या राजकीय पक्षांचे पदाधिकारी व कार्यकर्त्यांविरोधात संगमनेर तालुका पोलिसात पोलिस हेडकॉन्स्टेबल राजेंद्र घोलप यांनी फिर्याद दिली. पोलिसांनी अजय नारायण फटांगरे, पुणे- नाशिक रेल्वे कृती समितीचे सदस्य, जयश्री थोरात, शरद नारायण थोरात, किशोर बंद्रीनारायण टोकसे, अमोल भारत शेलकर, विजय रामनाथ राहणे, नामदेव शिवराम गुंजाळ, भाऊसाहेब रंगनाथ राहाणे, सागर किसन पावसे, डॉ. दानिश रईस खान, नुरमोहंमद शेख यांच्यासह सुमारे साडेतीन हजार आंदोलकांविरुद्ध भारतीय न्याय संहितेप्रमाणे गुन्हा दाखल केला आहे.

# शिक्षक भरतीऐवजी शिक्षक अतिरिक्त ...

खालावण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांची संख्या वाढवत नेल्यास भविष्यात आणखी शिक्षक अतिरिक्त ठरविण्याचा मार्ग मोकळा होईल, अशी भीतीही व्यक्त करण्यात आली आहे.

गेल्या १२ वर्षांत शिक्षक भरती झालेली नसल्याचा दावा करत, नवीन शिक्षक भरती करण्याऐवजी उपलब्ध शिक्षकांना अतिरिक्त ठरविण्याचे धोरण थांबवावे, अशी मागणी करण्यात आली आहे. कला शाखेतील वैकल्पिक विषयांच्या कमी करण्यात आलेल्या तुकड्याही पूर्ववत सुरू करून विद्यार्थ्यांना त्यांच्या आवडीचे विषय निवडण्याचा अधिकार अबाधित ठेवावा, असे निवेदनात म्हटले आहे.

'विद्यार्थ्यांच्या भवितव्याशी तडजोड नको'- विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गुणवत्तेला बाधा आणणारे सर्व निर्णय तातडीने पुनर्विचार करून मागे घ्यावेत. विद्यार्थी, पालक, शिक्षक संघटना आणि शिक्षण विभाग यांची संयुक्त बैठक घेऊन या प्रश्नावर कायमस्वरूपी तोडगा काढावा, अशी मागणी करण्यात आली आहे. विद्यार्थ्यांचे शैक्षणिक भविष्य सुरक्षित राहावे, शिक्षणाचा दर्जा उंचावावा आणि गुणवत्तापूर्ण शिक्षणाचा घटनात्मक अधिकार अबाधित राहावा, या उद्देशाने हा मोर्चा काढण्यात आला. यावेळी शिक्षण मंत्री दादा भुसे राजीनामा द्या अशा जोरदार घोषणा देण्यात आल्या. यावेळी छत्रपतीचे राज्याध्यक्ष अनिकेत घुले, राज्य संघटक विशाल शिंदे, राहुल जऱ्हाड, अभिषेक वैराळ, उदय पवार यांच्यासह हजारो विद्यार्थी सहभागी झाले होते.

शिक्षण क्षेत्रात शासनाचे धोरण विद्यार्थी हिताचे राहिले नसून अनेक समस्यांना विद्यार्थ्यांना सामोरे जावे लागत आहे. शिक्षणमंत्री दादा भुसे यांच्याकडे वारंवार तक्रार करूनही कुठलीही दखल घेतली जात नसल्याने विद्यार्थी रस्त्यावर उतरले आहेत. असे छात्र भारती अध्यक्ष अनिकेत घुले यांनी सांगितले.

# विद्यार्थी म्हणजे शिक्षकांचा अभिमान

शाळा ही केवळ विटा-सिमेंटची इमारत नसून, ती खऱ्या अर्थाने संस्कारांचे आणि भविष्याचे जणू माहेरघरच असते. या ज्ञानमंदिरात जेव्हा आपण प्रवेश करतो, तेव्हा समोर लहान मुलांच्या तेजाने तळपणारे चेहऱ्यावरील भाव आणि डोळ्यांमधील काहीतरी करून दाखवण्याची जिद्द दिसून येते. माझे विद्यार्थी हेच माझे खरे धन आहेत, माझा खरा अभिमान आहेत.

प्रत्येक विद्यार्थी हा एक वेगळा तारा आहे आणि त्याचे गुण वैशिष्ट्ये ही त्याच्याच प्रकाशामुळे चमकतात. आमची शाळा, जिल्हा परिषद प्राथमिक शाळा धांदरफळ खुर्द, तालुका संगमनेर, जिल्हा अहिल्यानगर, ही ज्ञानाची अशीच एक पावन भूमी आहे, जिथे हे तारे रोज नवनवीन गोष्टी शिकतात आणि यशाची शिखरे सर करतात.

माझ्या या लाडक्या विद्यार्थ्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे त्यांची प्रामाणिकपणा. कोणताही वर्ग असो वा खेळण्याचे मैदान, मुले नेहमीच सत्याची आणि नीतिमत्तेची कास धरतात. त्यांच्या चेहऱ्यावर असणारा निरागसपणा आणि मनातील प्रामाणिकपणा पाहून मन आनंदित होते. या प्रामाणिकपणासोबतच त्यांच्यात असलेली शिस्त ही वाखाणण्याजोगी आहे. प्रार्थनेच्या वेळी असो, ओळीने चालणे असो किंवा वर्गातील शिस्त असो, मुले स्वतःहून सर्व नियम पाळतात. शिस्तप्रियता हा त्यांच्या जीवनाचा जणू पाया बनला आहे.

केवळ अभ्यासातच नव्हे, तर बुद्धीच्या जोरावर विविध स्पर्धा परीक्षांमध्ये या विद्यार्थ्यांनी आपले नाव सुवर्णअक्षरांनी कोरले आहे. तालुका पातळी असो, जिल्हा पातळी असो किंवा राज्य पातळी असो आमच्या शाळेतील मुलांनी नेहमीच आपल्या यशाचा झेंडा रोवला आहे. मंथन राज्यस्तरीय प्रज्ञाशोध परीक्षा, सावित्रीबाई फुले परीक्षा तसेच विविध शिष्यवृत्ती परीक्षांमध्ये त्यांनी मिळवलेले यश आमच्यासाठी अत्यंत अभिमानास्पद आहे. शाळेतील वार्षिक स्नेहसंमेलन असो अथवा कोणतीही सांस्कृतिक स्पर्धा असो त्यामध्ये हिरीरीने भाग घेऊन उत्कृष्ट सादरीकरण करणे हा जणू त्यांचा छंदच बनला आहे. जेव्हा व्यासपीठावर येऊन ही मुले बक्षीस स्वीकारतात, तेव्हा शिक्षक म्हणून छाती अभिमानाने फुलून येते.

विद्यार्थ्यांच्या आवडीनिवडी देखील अतिशय अष्टपैलू आहेत. कुणाला चित्रकलेची आवड आहे, तर कुणाला वक्तृत्व आणि अभिनयाची गोडी आहे. काही मुले खेळताना मैदानावर जीव ओतून प्राविण्य मिळवतात, तर काही वाचनाच्या जगात रमतात. विज्ञान प्रदर्शनात नवनवीन प्रयोग करून पाहणे, गणितीय कोडी सोडवणे किंवा संगीताच्या तालावर ठेका धरणे या गोष्टी त्यांना खूप आनंद देतात. या विविध आवडीनिवडींमुळेच त्यांचे व्यक्तिमत्त्व अधिक खुलून दिसते.

त्यांच्या या प्रत्येक प्रवासात जिद्द, चिकाटी आणि न थकणारे प्रयत्न लपलेले आहेत. कठीण प्रसंगात न खचता पुन्हा उभे राहणे त्यांनी शिकले आहे. माझे सर्वच विद्यार्थी अत्यंत साध्या ग्रामीण पार्श्वभूमीतून येतात, परंतु त्यांच्या स्वप्नांची उंची आभाळाएवढी मोठी आहे.

माझे हे विद्यार्थी मला दररोज काहीतरी नवीन शिकवतात. त्यांच्या चेहऱ्यावरचे हास्य आणि प्रगतीची वाटचाल हीच माझ्या शिक्षक म्हणून जगण्याची खरी प्रेरणा आहे. मला पूर्ण विश्वास आहे की, हेच विद्यार्थी उद्याचे सुजाण नागरिक बनून देश आणि समाजाची सेवा करतील. माझ्या या गुणी आणि होतकरू विद्यार्थ्यांवर माझा नेहमीच सार्थ अभिमान राहील.

माझे विद्यार्थी
शाळेत रोज वेळेवर येणारे
गुरुजनांचा आदरणीय राखणारे
स्वच्छ गणवेशआणि चेहऱ्यावर हास्य
शिस्त हेच त्यांच्या जीवनाचे रहस्य
अभ्यासात त्यांचे असते पूर्ण लक्ष
नियम पाळण्यात ते असतात दक्ष
कष्टाची आणि वेळेची जाण ठेवतात
असेच विद्यार्थी जीवनात पुढे जातात.



**श्रीमती सावंत निता शिवाजी**
**उपाध्यापिका, जि. प. प्राथमिक शाळा, धांदरफळ खुर्द , ता.संगमनेर जि. अहिल्यानगर**

# संपादकीय...

## युवाशक्ती जागली, तर जग बदलेल !

युवा हे समाजाचे शक्तिस्थान आहेत आणि त्यांच्या विकासासाठी आणि सक्षमीकरणासाठी आपण सर्वांनी एकत्र येणे आवश्यक आहे. जागतिक युवा दिन हा त्यांना प्रोत्साहन देण्यासाठी आणि त्यांच्या योगदानाची ओळख पटवून देण्यासाठी एक महत्त्वपूर्ण संधी आहे. त्यामुळे या दिवसाचे महत्त्व ओळखून त्याचे योग्य प्रकारे पालन करणे आवश्यक आहे. जागतिक युवा दिन दरवर्षी १२ ऑगस्ट रोजी साजरा केला जातो. हा दिवस तरुणांच्या भूमिका, त्यांचे महत्त्व, आणि त्यांच्या समस्यांवर लक्ष केंद्रित करण्यासाठी साजरा केला जातो. युवा हे समाजाचा भविष्य आहेत आणि त्यांच्यातील सामर्थ्य, जोश, आणि कल्पकता हे समाजाच्या प्रगतीसाठी अत्यंत आवश्यक आहेत. जागतिक युवा दिनानिमित्त विविध उपक्रमांचे आयोजन केले जाते. यात कार्यशाळा, चर्चासत्रे, सांस्कृतिक कार्यक्रम आणि युवा नेतृत्व विकास कार्यक्रमांचा समावेश असतो. या उपक्रमांद्वारे तरुणांना त्यांचे अधिकार, जबाबदाऱ्या, आणि समाजातील त्यांच्या भूमिकेची जाणीव करून दिली जाते. या दिनानिमित्त तरुणांच्या समस्यांवर चर्चा केली जाते. शिक्षण, रोजगार, मानसिक आरोग्य, आणि सामाजिक न्याय यांसारख्या विषयांवर लक्ष केंद्रित केले जाते. तसेच, तरुणांच्या आवाजाला महत्त्व देऊन त्यांच्या समस्यांचे निराकरण करण्याचे प्रयत्न केले जातात. भारतात दरवर्षी १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा केला जातो. हा दिवस स्वामी विवेकानंद यांच्या जन्मदिनाला समर्पित आहे. स्वामी विवेकानंद यांचा जन्म दि.१२ जानेवारी १८६३ रोजी कोलकाता येथे झाला. भारतात राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची सुरुवात सन १९८५मध्ये झाली. तेव्हापासून आजपर्यंत दरवर्षी १२ जानेवारी हा दिवस युवा दिन म्हणून साजरा केला जातो. स्वामी विवेकानंद हे केवळ भारतातच नव्हे तर जगभर त्यांच्या विचार आणि आदर्शांसाठी प्रसिद्ध होते. लहान वयातच त्यांनी आपल्या कल्पनांनी जगभरात स्वतःची वेगळी प्रतिमा आणि ओळख निर्माण केली होती. त्यांनी नेहमीच तरुणांना त्यांच्या विचारांनी प्रेरित केले, म्हणूनच त्यांची जयंती युवा दिन म्हणून साजरी करण्याचा निर्णय घेण्यात आला. सन १९८४साली संयुक्त राष्ट्र संघाने ते वर्ष आंतरराष्ट्रीय युवा वर्ष म्हणून घोषित केले. त्यानंतर भारत सरकारने यावर विचार केला आणि तेव्हापासूनच दरवर्षी स्वामी विवेकानंदांच्या जयंती १२ जानेवारीला राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याचा निर्णय घेतला. सन १९८५मध्ये देशात प्रथमच राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला. महत्त्व आणि उद्देश्य- कोणत्याही देशाचा उत्तम विकास त्या देशातील तरुणांवर अवलंबून असतो. भारत हा तरुण लोकसंख्या असलेला देश आहे आणि देशाची प्रगती तरुणांवर अवलंबून आहे. त्यामुळे देशातील तरुणांना योग्य मार्गदर्शनासाठी हा दिवस साजरा केला जातो. विवेकानंदांच्या जयंतीनिमित्त युवा दिन साजरा करण्यामागचा उद्देश हा आहे की, युवकांनी विवेकानंदांच्या विचारांनी प्रेरित होऊन देशाच्या प्रगतीत हातभार लावावा. देशात राष्ट्रीय युवा दिनाच्या दिवशी सर्व शाळा आणि महाविद्यालयांमध्ये थीमसह स्पर्धा आयोजित केल्या जातात. याशिवाय मुले भाषणातून स्वामी विवेकानंदांचे अनमोल विचार सांगतात. आंतरराष्ट्रीय स्तरावर १२ ऑगस्ट हा दिवस आंतरराष्ट्रीय युवा दिन म्हणून साजरा केला जातो. दरवर्षी यानिमित्ताने युवकांशी निगडीत विशिष्ट पैलूवर चर्चा घडवून आणली जाते. यावर्षी शांती स्थापनेत युवकांचा सहभाग- युथ बिल्डींग पीस हे घोषवाक्य निश्चित करण्यात आले आहे. सृजनशील अशा युवा शक्तीच्या माध्यमातून जगभरात शांततेची स्थापना व्हावी हा यामागचा विचार आहे. संयुक्त राष्ट्रांनी १९८५मध्ये पहिले आंतरराष्ट्रीय युवा वर्ष साजरे केले. या घटनेच्या दहाव्या वर्धापन दिनानिमित्त १९९५मध्ये जगातील युवावर्गाच्या स्थितीत अनुकुल बदल घडवून आणण्यासाठी वर्ल्ड प्रोग्राम ऑफ क्शन फॉर युथ स्वीकारण्यात येऊन त्या माध्यमातून मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यात आली. या कार्यक्रमाच्या माध्यमातून संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्षण, रोजगार, गरिबी, आरोग्य, पर्यावरण, सहभाग, जागतिकीकरण, युवक आणि संघर्ष, एचआयव्ही एड्स आदी १५ क्षेत्रांची निवड प्राध्यान्याने केली. युवकांना मिळणाऱ्या संधींची संख्या वाढविणे, त्यांची गुणवत्ता वाढविणे आणि त्या माध्यमातून समाजासाठी युवकांचे योगदान वाढविणे यादिशेने या कार्यक्रमाद्वारे चांगले प्रयत्न झाले आहेत. लिस्बन येथे ८ ते १२ ऑगस्ट १९९८ दरम्यान पार पडलेल्या युवकांशी निगडीत मंत्र्यांच्या आंतरराष्ट्रीय परिषदेत १२ ऑगस्ट रोजी आंतरराष्ट्रीय युवा दिन साजरा करण्याची शिफारस करण्यात आली आणि त्यावर १७ डिसेंबर १९९९ रोजी संयुक्त राष्ट्र महासभेने शिक्कामोर्तब केले. तेव्हापासून हा दिवस युवा दिन म्हणून जगभरात साजरा करण्यात येतो.

**CHANGE OF NAME**

I HAVE CHANGE MY OLD NAME **AKSHAY VIKAS GODASE** (10th BOARD CERTIFIACTE) (BEFORE NAME) TO NEW NAME AS **AKSHAY VIKAS GODSE** (AADHAR NO. 834256803601) FROM VIDE AFFIDAVIT BEFORE NOTARY PUBLIC SHIRDI PLACE: SANGAMNER DATE: 06/08/2026

# ज्ञानमाता विद्यालयाचा संस्थापक दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - संगमनेर शहरातील शिस्तप्रिय म्हणून ओळखले जाणारे ज्ञानमाता विद्यालय व कनिष्ठ महाविद्यालयाच्या संस्थेचे संस्थापक, संत इग्नाती यांचा संस्थापक दिवस ३१ जुलै रोजी उत्साहात साजरा करण्यात आला. येशू संघाचे संस्थापक संत इग्नाती यांच्या सणाच्या निमित्ताने आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून रिपब्लिक पार्टी ऑफ इंडियाचे तालुकाप्रमुख आशिष प्रभाकर शेळके तसेच ऑल इंडिया ख्रिश्चन फोरमचे उपसंचालक अनिल भोसले उपस्थित होते. आशिष शेळके यांनी ज्ञानमातेच्या शैक्षणिक कार्याबद्दल तसेच विविध आठवणींना उजाळा दिला. अनिल भोसले यांनी ज्ञानमातेचे समाजातील शैक्षणिक योगदानाबद्दल विद्यार्थ्यांना संबोधित केले. ज्ञानमाता विद्यालयामध्ये दरवर्षी संत इग्नाती पंधरवडा साजरा करण्यात येतो. या वर्षी देखील विद्यार्थ्यांचा सर्वांगीण विकास व्हावा या उद्देशाने विविध स्पर्धांचे आयोजन करण्यात आले. त्यामध्ये चित्रकला स्पर्धा, निबंध स्पर्धा, समूहगीत गायन स्पर्धा, विज्ञान प्रश्नमंजुषा स्पर्धा, तसेच विविध मैदानी खेळांच्या स्पर्धांचे आयोजन करण्यात आले व यशस्वी विद्यार्थ्यांना प्रशस्तीपत्रक, सन्मान चिन्ह तसेच पुस्तके, पेन इत्यादी, विविध शालेय उपयोगी साहित्याचे वाटप करण्यात आले. विद्यालयाचे प्राचार्य फ्रान्सिस पटेकर यांनी येशुसंघीय संस्थांमध्ये शिक्षण घेऊन यशस्वी झालेल्या विद्यार्थ्यांची महती विशद केली तसेच विद्यार्थ्यांना संबोधित करताना अभ्यासाला महत्त्व देण्याचा उपदेश व्यक्त केला. सेंट मेरी धर्मग्राम चे धर्मगुरू ज्यो गायकवाड यांनी सर्वांना शैक्षणिक कार्यास शुभेच्छा दिल्या. सदर कार्यक्रम प्रसंगी सूत्रसंचालन व प्रस्तावना स्वाती शेळके यांनी, तर पाहुण्यांचा परिचय विकास बनसोडे यांनी केला. कार्यक्रमाचे आभार प्रा अमोल वर्पे यांनी केले. तसेच सदर कार्यक्रमानिमित्त प्रमुख पाहुणे म्हणून आशिष शेळके तसेच अनिल भोसले, फादर रॉबर्ट डीकोस्टा, प्राचार्य फादर फ्रान्सिस पटेकर, पर्यवेक्षक फादर प्रशांत शहाराव, उपप्राचार्या अर्चना डोंगरे, कनिष्ठ महाविद्यालयाच्या समन्वयक शारदा नवले, रवि शेळके, सर्व शिक्षक शिक्षकेतर कर्मचारी आणि शालेय विद्यार्थी उपस्थित होते.

# जिजामाता स्कूलमध्ये क्विझ स्पर्धेचा जल्लोष



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - जिजामाता स्कूलमध्ये विद्यार्थ्यांच्या सामान्य ज्ञानाला चालना देण्यासाठी तसेच त्यांच्यातील बौद्धिक क्षमता, तर्कशक्ती, आत्मविश्वास आणि स्पर्धात्मक वृत्ती विकसित करण्याच्या उद्देशाने **"Indian Tycoons InterHouse Quiz Competition'** चे उत्साहपूर्ण वातावरणात आयोजन करण्यात आले. इयत्ता सहावी ते नववीच्या विद्यार्थ्यांनी या स्पर्धेत उत्स्फूर्त सहभाग नोंदविला.

या क्विझ स्पर्धेत शाळेतील विंध्य हाऊस, सह्याद्री हाऊस, हिमालय हाऊस आणि सातपुडा हाऊस या चार हाऊसच्या विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला. स्पर्धेमध्ये विद्यार्थ्यांच्या ज्ञानाची कसोटी पाहण्यासाठी विविध स्वरूपातील तीन राउंड घेण्यात आले. विशेषतः दुसऱ्या राउंडमध्ये निगेटिव्ह मार्किंग सिस्टीम ठेवण्यात आल्याने विद्यार्थ्यांना विचारपूर्वक व अचूक उत्तरे देण्याचे आव्हान होते.

स्पर्धेचे आणखी एक वैशिष्ट्य म्हणजे श्रोत्यांनाही प्रश्नांची उत्तरे देण्याची संधी देण्यात आली. श्रोत्यांमधून योग्य उत्तर देणाऱ्या विद्यार्थ्यांना प्रोत्साहन म्हणून बक्षिसे देण्यात आली. त्यामुळे संपूर्ण स्पर्धेला उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला आणि विद्यार्थ्यांमध्ये ज्ञानाबरोबरच उत्साहाचे वातावरण निर्माण झाले. स्पर्धेच्या निकालामध्ये विंध्य हाऊसने प्रथम क्रमांक पटकावत बाजी मारली. सातपुडा हाऊसने द्वितीय क्रमांक, तर हिमालय हाऊस आणि सह्याद्री हाऊस यांनी संयुक्तपणे तृतीय क्रमांक मिळविला. स्पर्धेच्या परीक्षकाची भूमिका शाळेच्या प्राथमिक विभागाच्या समन्वयक प्रियंका कर्डिले मॅडम यांनी पार पाडली. स्पर्धेच्या संपूर्ण आयोजनाची व नियोजनाची सूत्रे शाळेच्या प्राचार्या सौ. जिज्ञासा कुलकर्णी मॅडम यांनी सांभाळली.

यावेळी प्राचार्या जिज्ञासा कुलकर्णी यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना, विद्यार्थ्यांनी आपले सामान्य ज्ञान सतत अद्ययावत ठेवावे. केवळ पाठ्यपुस्तकापुरता अभ्यास न करता इतर विषयांचेही भरपूर वाचन करून आपल्या ज्ञानाच्या कक्षा रुंदावाव्यात, असे आवाहन केले. तसेच अशा स्पर्धांमधून विद्यार्थ्यांचा आत्मविश्वास, निर्णयक्षमता आणि सादरीकरण कौशल्य विकसित होत असल्याचे त्यांनी सांगितले.

# श्री बाळेश्वर विद्यालयात जागतिक आदिवासी दिन उत्साहात



युवावार्ता (प्रतिनिधी)

सारोळेपठार - श्री बाळेश्वर विद्यालय, सारोळे पठार येथे जागतिक आदिवासी दिन उत्साहपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. यावेळी विद्यालयाचे प्राचार्य उत्तम खांडवी तसेच शिक्षकांच्या हस्ते भगवान बिरसा मुंडा आणि आद्य क्रांतिकारक राघोजी भांगरे यांच्या प्रतिमांचे पूजन करून अभिवादन करण्यात आले.

कार्यक्रमात शिक्षक संजय ठोकळ यांनी जागतिक आदिवासी दिनाचे महत्त्व विद्यार्थ्यांना समजावून सांगितले. ९ ऑगस्ट हा दिवस जगभरात जागतिक आदिवासी दिन म्हणून साजरा केला जातो. आदिवासी समाजाच्या हक्कांचे संरक्षण, त्यांच्या संस्कृती, भाषा व परंपरांचा सन्मान, तसेच जल, जंगल आणि जमिनीवरील त्यांच्या अधिकारांबाबत जनजागृती करणे हा या दिनाचा प्रमुख उद्देश असल्याचे त्यांनी सांगितले. संयुक्त राष्ट्र संघाने डिसेंबर १९९४ मध्ये ९ ऑगस्ट हा दिवस जागतिक आदिवासी दिन म्हणून घोषित केल्याची माहितीही त्यांनी दिली.

भगवान बिरसा मुंडा यांच्या कार्याची माहिती देताना त्यांनी सांगितले की, बिरसा मुंडा हे महान आदिवासी स्वातंत्र्यसैनिक, समाजसुधारक आणि लोकनायक होते. त्यांनी ब्रिटिशांच्या शोषणकारी राजवटीविरोधात तसेच जमीनदारांच्या अत्याचाराविरुद्ध आदिवासी समाजाला संघटित करून लढा उभारला. 'धरती आबा' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या बिरसा मुंडा यांनी जल, जंगल आणि जमिनीवरील हक्कांसाठी संघर्ष करत उलगुलान चळवळीला नेतृत्व दिले. यावेळी क्रांतिवीर राघोजी भांगरे यांच्या कार्यावरही प्रकाश टाकण्यात आला. इंग्रजांच्या जुलमी राजवटीविरुद्ध त्यांनी दिलेला लढा, त्यांचे शौर्य आणि बलिदान हे आदिवासी समाजाच्या संघर्षमय इतिहासातील प्रेरणादायी पर्व असल्याचे सांगण्यात आले.

या कार्यक्रमास मधुकर बांबळे, भाऊराव धोंगडे, रघुनाथ मेंगाळ, विकास सोनवणे, श्रीरंग गोडे, चेतन सरोदे, विश्वास पोखरकर, संतोष भांगरे, श्रीकृष्ण वर्पे, विठ्ठल फटांगरे, गंगाधर पोखरकर, डोंगरे सर, गोसावी सर, मंगेश औटी यांच्यासह विद्यालयातील शिक्षक व विद्यार्थी उपस्थित होते.

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/६०५/२०२६ दिनांक - ०७/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. गोपीनाथ आवजी मेंगाळ रा. सावरचोळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक २३/०६/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. सावरचोळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: मुलगी नामे **समृद्धी गोपीनाथ मेंगाळ** यांचा **जन्म मौजे सावरचोळ, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०२/१०/१०१९** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी सावरचोळ यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास निबंधक तथा ग्रामविकास अधिकारी सावरचोळ यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**

**तहसिलदार,तथा कार्यकारी दंडाधिकारी संगमनेर, यांचे कार्यालय ता. संगमनेर,जिल्हा अहिल्यानगर**

ई-मेल : tahsildarsangamner@gmail.com दूरध्वनी (०२४२५) २२५३५३
क्र. कावी/ जन्म नोंद/६०१/२०२६ दिनांक - ०६/०८/२०२६

**जाहिरनामा**

याद्वारे सर्व लोकांना जाहिररित्या कळविण्यात येते की, अर्जदार **श्री. अब्दुल करीम उस्मान शाह, रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** यांनी दिनांक ३१/०७/२०२६ रोजी दाखल केलेल्या अर्जावरुन सुरु करण्यात आले. अर्जदार हे **रा. संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथील रहिवासी असून अर्जदार यांचा/यांची स्वत: नामे **अब्दुल करीम उस्मान शेख** यांचा **जन्म मौजे संगमनेर, ता. संगमनेर, जि. अहिल्यानगर** येथे **दिनांक ०१/०३/१९७३** रोजी झाला असून त्यांचा/त्यांची **जन्म** नोंद मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगपरिषद संगमनेर यांचे कार्यालयामध्ये उपलब्ध नसल्यामुळे त्याबाबतची नोंद घेण्याबाबतचे प्रकरण या कार्यालयात दाखल केले आहे. तरी ज्या व्यक्तींना तक्रारी/हरकती दाखल करावयाच्या असल्यास मुख्याधिकारी तथा जन्म-मृत्यू निबंधक संगमनेर नगरपरिषद संगमनेर यांचे कार्यालयीन नोटीस बोर्डावर जाहीरनामा प्रसिध्दी झाल्या पासुन ३० दिवसाचे आत सुटीचे दिवस वगळून लेखी स्वरुपात तक्रार या कार्यालयात दाखल करावी. मुदतीनंतर त्या तक्रारीचा विचार केला जाणार नाही, कृपया याची नोंद घ्यावी.

**तहसिलदार संगमनेर**




**CHANGE IN NAME**

I HAVE CHANGED MY OLD NAME IS
HAROON YUNUS PATHAN
MY NEW NAME AS
HARUN YUNUS PATHAN
UIDAI 382220806768
ADRESS - GAVTHAN, SAMNAPUR, SANGAMNER 422605

**पाहिजेत**

श्री गणेश डिस्ट्रीब्यूटर्स्
श्री गणेश टायर्स
श्री गणेश ऑइल सेंटर
या फर्मसाठी
अकाऊंटंट - 2 जागा
पुरूष - टॅली आणि एक्सेलचे ज्ञान अवश्यक
कामाचा अनुभव आवश्यक
८९९९८६२७५९

**त्वरित भरती आजच संधीचा लाभ घ्या**

सर्व्हिस अॅडव्हायझर – 01 जागा
शैक्षणिक पात्रता :- ऑटोमोबाईल किंवा मेकॅनिकल डिप्लोमा
अनुभव :- फ्रेशर किंवा कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये १ वर्षाचा अनुभव असलेले उमेदवार अर्ज करू शकतात.
स्पेअर पार्ट्स बिलिंग – 01 जागा
कोणत्याही ऑटोमोबाईल शोरूममध्ये स्पेअर पार्ट्स बिलिंगचा किमान १ वर्षाचा अनुभव आवश्यक.
इच्छुक उमेदवारांनी त्वरित संपर्क साधावा.
पत्ता - घुलेवाडी ता. संगमनेर, जि. अ.नगर
मो. ९४२२७३५५६४

**पाहिजेत**

एक पुरुष कर्मचारी/मुलगा
पात्रता - लिहिता वाचता येणे आवश्यक
श्री विश्वगंध आयुर्वेद हॉस्पिटल
नवीन नगर रोड संगमनेर
– संपर्क –
7972999316

**फ्लॅट विकणे आहे**

2 BHK फ्लॅट विकणे आहे
नवीन बांधकाम, स्वतंत्र पार्किंगसह
ठिकाण: वृंदावन हाईट्स, चंद्रशेखर चौक, संगमनेर
– संपर्क –
8788945208
8208223721

**फॅकल्टी पाहिजे** अगस्ती अकॅडमी संगमनेर

ऑनलाईन / ऑफलाईन अभ्यासक्रम
पशुधन पर्यवेक्षक भरती कोर्स
पशुवैद्यकीय विज्ञानातील पदविका (Diploma) किंवा पदवी (Degree) आवश्यक.
AMVI – 461 जागा MPSC (सहायक मोटार वाहन निरीक्षक)
यांत्रिक अभियांत्रिकी (Mechanical Engineering) मधील पदवी आवश्यक.
सरळसेवा बॅच २०२६ लवकरच सुरू
MPSC राज्यसेवा | गट B गट C | पोलिस भरती | बँकींग परिक्षा | सर्व स्पर्धा परिक्षा
अनुभवी व तज्ज्ञ शिक्षकवर्ग
सविस्तर मार्गदर्शन
नियमित टेस्ट, PYQ सराव व चर्चा
LIVE + Recorded बॅच सुविधा
वैयक्तिक मार्गदर्शन व शंका निरसन
पत्ता : नाशिक – पुणे हायवे, संचित बिल्डिंग, पहिला मजला महाराष्ट्र बँकेच्या वरती, संगमनेर - ४२२६०५
6005401510
9209645727






## दिनविशेष

२०२२: सलमान रश्दी — एंग्लो-इंडियन लेखक, यांच्यावर चौटौका, न्यूयॉर्क, अमेरिकेत एका सार्वजनिक कार्यक्रमात हल्ला झाला.

२००२: सर्गेई कार्जाकिन — हे १२ वर्षे ७ महिने वयाचे जगातील सर्वात लहान वयात बुद्धीबळातील ग्रँडमास्टर बनले.

१९९५: मायकेल जॉन्सन — अमेरिकन खेळाडू यांनी जागतिक मैदानी स्पर्धेत २०० मी आणि ४०० मी अशा दोन्ही धावण्यांच्या शर्यतीत सुवर्णपदक मिळवले. अशी कामगिरी करणारे ते पहिले पुरुष धावपटू ठरले.

१९९०: स्यू (टायरानोसॉरस रेक्स सांगाडा) — हा आजपर्यंत सापडलेला सर्वात मोठा आणि संपूर्ण टायरानोसॉरस रेक्स सांगाडा, दक्षिण डकोटा येथे सापडला.

१९८९: जागतिक मराठी परिषद — कुसूमाग्रज यांच्या अध्यक्षतेखाली पहिली परिषद सुरू झाली.

१९८१: आई.बी.एम. — कंपनीचे पहिले पर्सनल कॉम्प्युटर प्रकशित करण्यात आले.

## जन्म

१९७२: टेक्नोहाना कोजी — जपानी सुमो कुस्तीपटू, ६५ वा योकोझुना

१९७२: ज्ञानेंद्र पांडे — भारतीय क्रिकेट खेळाडू

१९६३: कोजी कीतॉ — जपानी सुमो कुस्तीपटू, ६०वे योकोझुना (निधन: १० फेब्रुवारी २०१९ )

१९६०: इस्माइल श्रॉफ — भारतीय चित्रपट दिग्दर्शक (निधन: २६ ऑक्टोबर २०२२ )

१९५९: प्रवीण ठिपसे — बुद्धीबळपटू

१९५४: फ्रँकोइस ओलांद — फ्रान्स देशाचे २४वे राष्ट्राध्यक्ष, वकील आणि राजकारणी

१९५२: सीताराम येचुरी — भारतीय राजकारणी आणि CPI(M) चे नेते

१९४८: फकिरा मुंजाजी शिंदे — कवी, समीक्षक व अनुवादक

१९४३: जावेद आलम — भारतीय शिक्षणतज्ज्ञ (निधन: ५ डिसेंबर २०१६ )

१९३९: सुशील कोईराला — नेपाळ देशाचे ३७वे पंतप्रधान, नेपाळी राजकारणी (निधन: ९ फेब्रुवारी २०१६ )

## मृत्यू

२०२२: अंशू जैन — भारतीय-ब्रिटिश बँकर, ड्यूश बँकेचे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी (जन्म: ७ जानेवारी १९६३ )

२०१२: जो कुबर्ट — पोलिश-अमेरिकन चित्रकार, कुबर्ट स्कूलचे संस्थापक (जन्म: १८ सप्टेंबर १९२६ )

२०१०: आयझॅक बोनेविट्स — अमेरिकन ड्रुइड, लेखक आणि कार्यकर्ते, Ár nDraíocht Féin चे संस्थापक (जन्म: १ ऑक्टोबर १९४९ )

२०१०: गुइडो डी मार्को — माल्ट देशाचे ६वे अध्यक्ष, वकील आणि राजकारणी (जन्म: २२ जुलै १९३१ )

२००५: जॉन लोडर — इंग्लिश ध्वनी अभियंते आणि निर्माते, सदर्न स्टुडिओचे संस्थापक (जन्म: ७ एप्रिल १९४६ )

२००४: गॉडफ्रे हॉन्सफिल्ड — इंग्रजी जैवभौतिकशास्त्रज्ञ आणि अभियंते — नोबेल पुरस्कार (जन्म: २८ ऑगस्ट १९१९ )

१९८९: विल्यम शॉकली — अमेरिकन भौतिकशास्त्रज्ञ आणि शैक्षणिक — नोबेल पुरस्कार (जन्म: १३ फेब्रुवारी १९१० )




## दररोज थोडा अभ्यास.. यशाकडे एक नवे पाऊल!

स्पर्धा परीक्षा, विद्यार्थी आणि ज्ञानप्रेमी वाचकांसाठी दैनिक युवावार्ताचा हा विशेष उपक्रम. या सदरामध्ये दररोज दिनविशेष, जयंती, पुण्यतिथी, ऐतिहासिक घटना, महत्त्वाच्या व्यक्तींची माहिती, सामान्य ज्ञान व स्पर्धा परीक्षांसाठी उपयुक्त तथ्ये संक्षिप्त आणि अभ्यासपूर्ण स्वरूपात प्रकाशित करण्यात येतील.

**१२ ऑगस्ट**

# कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली १९८९ मध्ये जागतिक मराठी परिषदेचा ऐतिहासिक प्रारंभ

१९८९ हे वर्ष मराठी भाषा, साहित्य आणि संस्कृतीच्या इतिहासातील महत्त्वाचे वर्ष मानले जाते. याच वर्षी जागतिक मराठी परिषदेची पहिली परिषद आयोजित करण्यात आली. मराठी भाषिकांना जगाच्या विविध भागांत एकत्र आणणे, मराठी भाषा-साहित्य-संस्कृतीचे संवर्धन करणे आणि मराठी माणसामधील सांस्कृतिक नाते अधिक दृढ करणे, हा या उपक्रमामागील प्रमुख उद्देश होता.पहिल्या जागतिक मराठी परिषदेच्या अध्यक्षपदाची जबाबदारी कुसुमाग्रज अर्थात वि. वा. शिरवाडकर या महाराष्ट्राच्या महान साहित्यिकांनी स्वीकारली. कुसुमाग्रज हे केवळ साहित्यिक नव्हते, तर मराठी भाषा आणि महाराष्ट्राच्या सांस्कृतिक अस्मितेचे प्रभावी प्रतिनिधी होते. त्यांच्या नेतृत्वामुळे या परिषदेचे महत्त्व अधिक वाढले.जगभरातील मराठी भाषिकांना एका व्यासपीठावर आणण्याची कल्पना त्या काळात अत्यंत महत्त्वाची होती. शिक्षण, साहित्य, कला, संस्कृती, उद्योग, सामाजिक कार्य आणि विविध क्षेत्रांत कार्यरत असलेल्या मराठी व्यक्तींमध्ये संवाद निर्माण करण्याचे काम या परिषदेच्या माध्यमातून सुरू झाले. परदेशात स्थायिक झालेल्या मराठी समाजाला आपल्या मातृभाषेशी आणि मातृभूमीशी जोडून ठेवण्यासाठीही या उपक्रमाला विशेष महत्त्व प्राप्त झाले.जागतिक मराठी परिषदेच्या माध्यमातून मराठी साहित्यिक, लेखक, कलाकार, विचारवंत आणि विविध क्षेत्रांतील मान्यवर यांना एकत्र येण्याची संधी मिळाली. मराठी भाषेच्या भवितव्यावर, नव्या पिढीपर्यंत मराठी पोहोचविण्यावर आणि बदलत्या काळात मराठी संस्कृतीचे जतन करण्यावर चर्चा होऊ लागली.कुसुमाग्रजांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या या पहिल्या परिषदेने मराठी भाषेच्या जागतिक विस्ताराला एक नवी दिशा दिली. मराठी भाषा केवळ महाराष्ट्रापुरती मर्यादित नसून जगभरातील मराठी समाजाच्या भावविश्वाचा केंद्रबिंदू आहे, ही भावना अधिक दृढ झाली.पुढील काळात जागतिक मराठी परिषदेच्या माध्यमातून विविध कार्यक्रम, साहित्यिक उपक्रम आणि सांस्कृतिक संवाद सुरू राहिले. परदेशात राहणाऱ्या मराठी नागरिकांना आपल्या भाषेची आणि संस्कृतीची ओळख पुढील पिढ्यांपर्यंत पोहोचविण्यासाठी अशा उपक्रमांनी महत्त्वाची भूमिका बजावली.१९८९ मध्ये झालेली पहिली जागतिक मराठी परिषद ही मराठी समाजाच्या जागतिक एकतेची सुरुवात ठरली. कुसुमाग्रजांसारख्या साहित्यिकाच्या नेतृत्वामुळे या ऐतिहासिक उपक्रमाला वैचारिक आणि सांस्कृतिक बळ मिळाले.

# अंशू जैन : जागतिक बँकिंगमधील भारतीय चेहरा

**पुण्यतिथी विशेष**

अंशू जैन हे भारतीय वंशाचे प्रसिद्ध आंतरराष्ट्रीय बँकर होते. जागतिक वित्तीय क्षेत्रात आपल्या कर्तृत्वाची स्वतंत्र ओळख निर्माण करणाऱ्या भारतीयांमध्ये त्यांचे नाव आदराने घेतले जाते. त्यांचा जन्म ७ जानेवारी १९६३ रोजी भारतात झाला. अर्थशास्त्र आणि वित्तीय क्षेत्रातील उच्च शिक्षण घेतल्यानंतर त्यांनी आंतरराष्ट्रीय बँकिंग क्षेत्रात आपली कारकीर्द सुरू केली.अंशू जैन यांनी दिल्ली विद्यापीठातून अर्थशास्त्राचे शिक्षण घेतले. त्यानंतर अमेरिकेतील मॅसॅच्युसेट्स विद्यापीठातून वित्त विषयात पदव्युत्तर शिक्षण घेतले. शिक्षण पूर्ण केल्यानंतर त्यांनी अमेरिकेतील वित्तीय क्षेत्रात काम करण्यास सुरुवात केली. त्यांच्या कुशाग्र बुद्धिमत्तेमुळे, वित्तीय बाजारपेठेचे सखोल ज्ञान आणि व्यवस्थापन कौशल्यामुळे त्यांची कारकीर्द वेगाने पुढे गेली.त्यांच्या कारकिर्दीतील सर्वात महत्त्वाचा टप्पा म्हणजे ड्यूश बँकेचे सह-मुख्य कार्यकारी अधिकारी म्हणून मिळालेली जबाबदारी. २०१२ मध्ये त्यांनी या पदाची सूत्रे स्वीकारली. जगातील आघाडीच्या वित्तीय संस्थांपैकी एका संस्थेच्या सर्वोच्च नेतृत्वात भारतीय वंशाचा व्यक्ती पोहोचणे ही भारतासाठी अभिमानाची बाब मानली गेली.ड्यूश बँकेत काम करण्यापूर्वी अंशू जैन यांनी जागतिक गुंतवणूक बँकिंग क्षेत्रात महत्त्वाच्या जबाबदाऱ्या सांभाळल्या होत्या. विशेषतः स्थिर उत्पन्न बाजारपेठ, चलन व्यवहार आणि कमोडिटी क्षेत्रात त्यांना मोठा अनुभव होता. त्यांच्या नेतृत्वामुळे ड्यूश बँकेच्या जागतिक गुंतवणूक बँकिंग व्यवसायाला महत्त्वपूर्ण दिशा मिळाली.जागतिक वित्तीय बाजारपेठेतील त्यांचे ज्ञान आणि निर्णयक्षमता यामुळे त्यांना आंतरराष्ट्रीय



स्तरावर मोठा सन्मान मिळाला. भारतीय वंशाच्या व्यक्तीने परदेशातील अत्यंत प्रतिष्ठित वित्तीय संस्थेच्या सर्वोच्च पदापर्यंत पोहोचून नेतृत्व करणे, ही त्यांच्या कर्तृत्वाची मोठी नोंद ठरली.ड्यूश बँकेतील कार्यकाळानंतर अंशू जैन यांनी कॅन्टर फिट्झगेराल्ड या जागतिक वित्तीय सेवा कंपनीत अध्यक्ष म्हणूनही काम केले. या काळात त्यांनी वित्तीय सेवा क्षेत्रातील आपला अनुभव आणि नेतृत्वकौशल्य पुढेही प्रभावीपणे वापरले.अंशू जैन यांचे व्यक्तिमत्त्व भारतीय तरुणांसाठी प्रेरणादायी होते. जागतिक स्तरावरील मोठ्या संस्थांमध्ये भारतीय व्यावसायिक नेतृत्व करू शकतात, हे त्यांनी आपल्या कारकिर्दीतून दाखवून दिले. कठोर परिश्रम, ज्ञान, व्यावसायिक कौशल्य आणि दूरदृष्टी यांच्या जोरावर जागतिक पातळीवर यश मिळवता येते, याचे ते उत्तम उदाहरण होते.१२ ऑगस्ट २०२२ रोजी अंशू जैन यांचे निधन झाले. त्यांच्या निधनाने जागतिक बँकिंग आणि वित्तीय क्षेत्रातील एक कर्तृत्ववान व्यक्तिमत्त्व हरपले. मात्र, भारतीय वंशाच्या बँकरने जागतिक वित्तीय क्षेत्रात निर्माण केलेली प्रभावी ओळख आणि त्यांचे योगदान दीर्घकाळ स्मरणात राहील.

# नियमित कर्जदारांच्या मागण्यांसाठी किसान सभेचे 'जेल भरो'



युवावार्ता (प्रतिनिधी)

अकोले - नियमित कर्जदार शेतकऱ्यांना दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान द्यावे, पीक विम्याचे ट्रिगर पुन्हा लागू करावे, तसेच वन, देवस्थान, गायरान, वरकस आणि घरांच्या तळ जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या नावे कराव्यात, या प्रमुख मागण्यांसाठी अखिल भारतीय किसान सभेच्या नेतृत्वाखाली मंगळवारी राज्यातील २३ जिल्ह्यांत तीव्र निदर्शने व 'जेल भरो' आंदोलन करण्यात आले. हजारो शेतकऱ्यांनी या आंदोलनात सहभागी होत सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी केली.

कर्जमाफीच्या योजनेत नियमितपणे कर्जाची परतफेड करणाऱ्या शेतकऱ्यांची केवळ ५० हजार रुपयांवर बोळवण करण्यात आली आहे. नियमित कर्ज भरले, म्हणजे आम्ही पाप केले का? असा संतप्त सवाल आंदोलक शेतकऱ्यांनी उपस्थित केला. नियमित कर्जदार शेतकऱ्यांना सरकारने दोन लाख रुपयांचे प्रोत्साहन अनुदान देऊन दिलासा द्यावा, अशी मागणी यावेळी करण्यात आली.

पीक विमा योजनेतील 'ट्रिगर' पुन्हा लागू करावा, अशीही मागणी किसान सभेने केली आहे. त्याचबरोबर देवस्थान जमिनीवरून शेतकऱ्यांना बेदखल करण्याची कारवाई तातडीने थांबवावी. अनेक वर्षांपासून वन, गायरान, वरकस, देवस्थान तसेच घरांच्या तळ जमिनी कसणाऱ्या शेतकऱ्यांच्या जमिनी त्यांच्या नावे कराव्यात, अशी मागणी आंदोलनादरम्यान करण्यात आली.

ठाणे-पालघर, नाशिक, अहिल्यानगर, सांगली, कोल्हापूर, सातारा, पुणे, बीड, परभणी, नांदेड, वर्धा, यवतमाळ, अमरावती, बुलढाणा, नंदुरबार यांसह राज्यातील २३ जिल्ह्यांत आंदोलन करण्यात आले. विविध ठिकाणी शेतकऱ्यांनी निदर्शने करून प्रशासनाला निवेदने दिली.

दरम्यान, सरकारने या आंदोलनाची गांभीर्याने दखल घेऊन शेतकऱ्यांच्या मागण्यांवर तातडीने निर्णय घेतला नाही, तर किसान सभेच्या नेतृत्वाखाली २० ऑगस्टपासून राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांच्या निवासस्थानासमोर भव्य बेमुदत राज्यव्यापी 'महामुक्काम' आंदोलन सुरू करण्यात येईल, असा इशारा देण्यात आला.

राज्यभर झालेल्या या आंदोलनाचे नेतृत्व डॉ. अशोक ढवळे, जे. पी. गावीत, डॉ. अजित नवले, उमेश देशमुख, आमदार विनोद निकोले, किरण गहला, इरफान शेख, सुभाष चौधरी, उद्धव पौळ, अजय बुरांडे, डॉ. अमोल वाघमारे, सदाशिव साबळे, यशवंत झाडे, अर्जुन आडे, शंकर सिडाम, कुमार मोहरमपुरी, माणिक अवघडे आदींनी केले.

# माहूली परिसरात रानडुकराचा शेतकऱ्यावर हल्ला, गंभीर जखमी

युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर - तालुक्याच्या पठार भागातील खंदरमाळवाडी गावांतर्गत असलेल्या माहूली परिसरात रानडुकराने एका ५६ वर्षीय शेतकऱ्यावर अचानक हल्ला केल्याची घटना सोमवार, दि. १० ऑगस्ट रोजी सकाळी घडली. या हल्ल्यात शेतकरी तुळशीदास रामभाऊ गाडेकर यांच्या चेहऱ्यावर तसेच पाठीवर गंभीर दुखापत झाली आहे. सुदैवाने या हल्ल्यातून ते बालंबाल बचावले.

तुळशीदास गाडेकर हे माहूली परिसरात आपल्या कुटुंबासह राहत आहेत. सोमवारी सकाळी ते जनावरांसाठी चारा आणण्यासाठी शेतात गेले होते. शेताच्या बांधावर गवत कापत



असताना अचानक शेजारील शेतातून रानडुक्कर आले आणि त्याने गाडेकर यांच्यावर जोरदार हल्ला चढविला. या हल्ल्यात त्यांच्या चेहऱ्यावर आणि पाठीवर गंभीर दुखापत झाली.

गाडेकर यांनी आरडाओरड केल्यानंतर त्यांचा आवाज ऐकून आजूबाजूच्या नागरिकांनी तातडीने घटनास्थळी धाव घेतली. जखमी गाडेकर यांना तत्काळ खासगी रुग्णालयात दाखल करण्यात आले. तेथे प्राथमिक उपचार केल्यानंतर पुढील उपचारासाठी त्यांना संगमनेर येथे हलविण्यात आले. असल्याची माहिती पांडुरंग गाडेकर यांनी दिली.

दरम्यान, माहूली परिसरात रानडुकरांची संख्या मोठ्या प्रमाणात वाढली असून, रानडुकरांकडून शेतातील पिकांचे मोठ्या प्रमाणात नुकसान होत असल्याचे शेतकऱ्यांचे म्हणणे आहे. आतापर्यंत पिकांचे नुकसान करणाऱ्या रानडुकरांकडून आता थेट शेतकऱ्यांवर हल्ले होऊ लागल्याने परिसरातील शेतकऱ्यांमध्ये भीतीचे वातावरण निर्माण झाले आहे.

# पुण्यात नोव्हेंबरमध्ये रंगणार महात्मा फुले विचार

## साहित्य व संस्कृती संमेलन, राष्ट्र सेवा दलाचा पुढाकार

पुणे (वृत्तसंस्था)

राष्ट्र सेवा दलाच्या पुढाकाराने राष्ट्रीय पातळीवरील महात्मा फुले विचार, साहित्य व संस्कृती संमेलन पुणे येथे २७, २८ व २९ नोव्हेंबर २०२६ रोजी आयोजित करण्यात आले आहे. तीन दिवस चालणाऱ्या या संमेलनात देशभरातील विचारवंत, भाष्यकार, अभ्यासक, संशोधक, लेखक, कवी, संपादक, पत्रकार, प्राध्यापक, कलाकार, कृतीवंत तसेच जेन झी आंदोलनाशी संबंधित विविध विद्यापीठांतील विद्यार्थी सहभागी होणार आहेत.

संमेलनाच्या निमित्ताने पुस्तक प्रदर्शन, जेन झी आंदोलनातील तरुणांच्या पोस्टरचे प्रदर्शन, तरुण व्यंगचित्रकारांचे लाईव्ह व्यंगचित्र प्रदर्शन, संविधान दालन यांसह विविध उपक्रमांचे आयोजन करण्यात येणार आहे. तसेच विविध विषयांवरील टॉक शो, मान्यवरांच्या मुलाखती, व्याख्याने, नाट्यप्रयोग, गाणी आणि कविता सादरीकरणाने संमेलनाला वैचारिक व सांस्कृतिक रंगत येणार आहे. 'लेखक, कवी आपल्या भेटीला' हा विशेष उपक्रमही प्रकाशकांच्या पुस्तक दालनात आकर्षणाचे केंद्र ठरणार आहे.

महात्मा फुले यांच्या जन्मद्विशताब्दीचे औचित्य, महाडच्या चवदार तळे सत्याग्रहाची शताब्दी, मनुस्मृती दहनाच्या शताब्दीचे स्मरण तसेच राजर्षी शाहू महाराजांनी दिलेल्या आरक्षणाला १२५ वर्षे पूर्ण होत असल्याच्या पार्श्वभूमीवर राष्ट्र सेवा दलाकडून वर्षभर 'विषमता निर्मूलन निर्धार वर्ष' देशभर साजरे करण्यात येत आहे.

या संमेलनासाठी विशेष संमेलन समिती स्थापन करण्यात आली असून, त्यात लक्ष्मीकांत देशमुख, भारत सासणे, राजन गवस, प्रवीण बांदेकर, नीरज हातेकर, अलीम वकील, अरुण म्हात्रे, ज्ञानेश महाराव, निशिकांत कोलगे, आशालता कांबळे, विनोद शिरसाठ, लक्ष्मण यादव, हुबनाथ पांडे, प्रकाश दुबे, प्रदीप दाते, किशोर ढमाले, सुबोध मोरे, प्रतिमा परदेशी, सोमनाथ रोडे, सरफराज अहमद, सूरज येंगडे, जयवंत पाटील, अजित शिंदे आणि राजा कांदळकर यांचा समावेश आहे. विशेष निमंत्रित म्हणून कपिल पाटील, सुभाष वारे, अंजली आंबेडकर, अभिजित वैद्य आणि नितीन वैद्य यांचा समावेश करण्यात आला आहे. संमेलनाचे स्वरूप अधिक व्यापक आणि लोकाभिमुख करण्यासाठी नागरिक, साहित्यिक, कलाकार, विद्यार्थी तसेच विचारवंतांनी आपल्या सूचना व्हॉट्सपद्वारे आयोजकांकडे पाठवाव्यात, असे आवाहन करण्यात आले आहे.

संमेलनात सहभाग नोंदविण्यासाठी आणि अधिक माहितीसाठी रोहित ढाले - ९८६९८१९८७८, सागर भालेराव - ९९६७०५५६३०, प्रशांत इंगळे - ९४२०८८९८६२, अभिजित आंब्रे - ८६०५४००३७३ यांच्याशी संपर्क साधावा.

# धीरज राजपूत हत्या प्रकरणी आरोपींवर कठोर कारवाईची मागणी

## सकल हिंदू समाजाचे पोलिसांना निवेदन



युवावार्ता (प्रतिनिधी)

संगमनेर -मुकुंदनगर येथील धीरज राजपूत - परदेशी यांच्या कब्रस्तान परिसरात झालेल्या हत्येच्या निषेधार्थ बजरंग दलाच्या वतीने मंगळवारी संगमनेर पोलीस ठाण्यात निवेदन देण्यात आले. या प्रकरणातील सर्व आरोपींना तातडीने अटक करून निष्पक्ष व जलद तपास करावा, तसेच दोषींवर कायद्यानुसार कठोरात कठोर कारवाई करावी, अशी मागणी निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

निवेदनात म्हटले आहे की, धीरज राजपूत यांच्या हत्येच्या घटनेमुळे मुकुंदनगर तसेच शिवडी परिसरातील नागरिकांमध्ये संताप आणि असुरक्षिततेची भावना निर्माण झाली आहे. प्राथमिक माहितीनुसार, धीरज राजपूत यांनी कपाळावर भगवा टिळा लावल्याच्या कारणावरून त्यांच्यावर हल्ला करून हत्या करण्यात आल्याचा आरोप करण्यात आला आहे. मात्र, हत्येमागील नेमके कारण, आरोपींचा हेतू आणि घटनेची संपूर्ण पार्श्वभूमी याबाबत पोलिसांनी सखोल व निष्पक्ष तपास करावा, अशी मागणी निवेदनात करण्यात आली आहे. या प्रकरणातील सर्व आरोपींचा तातडीने शोध घेऊन अटक करावी, हत्येचे कारण व हेतू स्पष्ट करावा आणि दोषींविरुद्ध कायद्यानुसार कठोर कारवाई करावी, अशी मागणी करण्यात आली. दोष सिद्ध झाल्यास आरोपींना मृत्युदंडाची शिक्षा मिळावी, यासाठी सक्षमपणे न्यायालयीन प्रक्रिया राबवावी, असेही निवेदनात नमूद करण्यात आले आहे. याशिवाय मृताच्या कुटुंबीयांना आवश्यक सुरक्षा व शासकीय मदत द्यावी, तसेच मुकुंदनगर आणि शिवडी परिसरात कायदा व सुव्यवस्था कायम ठेवण्यासाठी पोलिस गस्त व सुरक्षा व्यवस्था वाढवावी, अशी मागणी करण्यात आली आहे.

दरम्यान या प्रकरणात तातडीने व कठोर कायदेशीर कारवाई न झाल्यास संपूर्ण अहिल्यानगर जिल्ह्यात तीव्र आंदोलन छेडण्यात येईल, असा इशारा निवेदनातून देण्यात आला आहे. न्याय मिळेपर्यंत लोकशाही व कायदेशीर मार्गाने आंदोलन सुरू ठेवण्याची भूमिका संघटनेने व्यक्त केली आहे. सकल हिंदू समाजाच्या वतीने शिरीष मुळे, ज्ञानेश्वर कर्पे, अ‍ॅड.विशाल जाधव, योगेश सूर्यवंशी, पायल ताजणे, साक्षी सूर्यवंशी, पूनम दायमा, रेखाताई गलांडे, शिवाज्ञा अरगडे, संगीता पुंड, कुलदीप ठाकूर, रोहित वाळके, सुरेश कालडा, प्रशांत बेल्हेकर, गोपाल राठी, विशाल वाकचौरे, भारत गवळी तसेच विविध हिंदुत्ववादी संघटनेचे पदाधिकारी व कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

पाईल्सचा कायमचा उपाय !
वेदना, रक्तस्त्राव, जळजळ?
ताम्हाणे हॉस्पिटल
आता सुरक्षित आणि सोप उपचार उपलब्ध
पाईल्स (PILES) | फिशर (FISSURE) | फिस्टुला (FISTULA)
आधुनिक उपचार पद्धती
● कमी वेदना, जलद बरे होणे
● लेझर व प्रगत तंत्रज्ञान
● अनुभवी जड्ड डॉक्टरांचा सल्ला
● गोपनीयतेची पूर्ण काळजी
फोन नं. ०२४२५-२२००५०
संपर्क - 7219100100
सुरक्षित उपचार | अनुभवी टीम | लवकर आराम | आपली सेवा आमची बांधिलकी
पत्ता - इंदिरानगर, गल्ली नं. १०, विठ्ठल मंदिराजवळ, अकोले बायपास रोड, संगमनेर

दैनिक
# युवावार्ता
परिवर्तनाचा पुरस्कर्ता
Web : www.yuvavarta.in/com
Mail : dailyyuvavarta@gmail.com

आपल्या व्यवसायाची जाहीरात येथे प्रसिद्ध करा
संपर्क
८८३०५०८२४४ ८३८०९५६६०४
७६२०३८८२३०



# कै. गं.भा. पार्वताबाई पोपटगिरी गोसावी यांना भावपूर्ण श्रद्धांजली



## संघर्ष, त्याग आणि मायेच्या मूर्ती

१७ जानेवारी १९३२ रोजी गणोरे येथील धार्मिक आणि संस्कारशील कुटुंबात त्यांचा जन्म झाला. वडील भाऊगीर गोसावी आणि आई चंद्रभागा गोसावी यांच्या पोटी जन्मलेल्या पार्वताबाईंनी बालपणापासूनच गरिबीचे चटके सोसले. शिक्षणाची ओढ असूनही त्यांनी स्वतःचे शिक्षण बाजूला ठेवले आणि भावंडांनी शिकावे म्हणून बिडी बांधण्याचे काम स्वीकारले. त्यांच्या त्यागातून भावंडांचे भविष्य उजळले.

विवाहानंतर हिवरगाव पावसा येथील गोसावी कुटुंबात आल्यावरही परिस्थिती बदलली नाही. सासू यमुनाबाई सासरे दशरथ बाबा , गुलाबबाबा, बाळगीर बाबा आणि संपूर्ण कुटुंबाची जबाबदारी त्यांनी समर्थपणे पेलली. संगमनेरच्या माळीवाडा भागात बिडी बांधण्याच्या मजुरीवर त्यांनी संसाराचा गाडा पुढे नेला.

त्यांचे पती पोपट दशरथ गोसावी हे श्रमिक सिन्नर येथे कारकून म्हणून कार्यरत असल्याने अनेक महिने घरापासून दूर राहत. अशा वेळी संपूर्ण कुटुंबाची धुरा पार्वताबाईंनी एकट्याने सांभाळली. तीन मुली आणि तीन मुलांच्या संगोपनात त्यांनी आयुष्य झोकून दिले.तीन मुली व तीन मुले यांचा त्यांच्या संसारात भर पडली मोठी लेक सुमन हिचा पंधराव्या वर्षी लग्न झाले डीग्रस येथील नामदेव पुरी यांच्याशी त्यांचा विवाह झाला लग्न करण्यासाठी आई-बाबा कडे पैसे नव्हते गावातील लोकांनी वर्गणी काढून तिचा विवाह पार पाडला दुसरी मुलगी राधाबाई तिचा विवाह राजापूर येथील भाऊसाहेब गणपतगिर गोसावी यांच्याशी झाला. तिने लग्नानंतर आई वडिलांसाठी खूप मदत केली. भावांसाठी आधारस्तंभ म्हणून ती सतत पाठीशी राहिली.तिसरी लेक शशिकला तिचा विवाह देवठाण येथील बाबासाहेब पुरी यांच्याशी झाला गरिबीतून दिवस काढत काढत या तिन लेकींचा विवाह झाला

त्यांच्या आयुष्यात अनेक दुःखद प्रसंग आले. अशातच काळाने घाला घातला मोठा मुलगा यमन याचे दहावीत असतानाच निधन झाले. फुल उमलण्याआधीच देवाने केलेले घरभर पसरलेली हास्य क्षणातच हरपले आठवणीच्या कुशीतच आता जगणे उरले. तिसऱ्या मुलीच्या जन्मावेळी त्यांना टी.बी.चा आजार झाला. उपचारासाठी औंध येथे जावे लागले. संसार विस्कळीत झाला, मुले मामाच्या घरी, पती सोलापूर येथे आणि त्या उपचारासाठी औंध येथे होत्या- तरीही त्यांनी हार मानली नाही. यावेळी बहीण शांताबाई हिने खूप मदत केली. मोल मजुरी करून तिने औषध उपचार साठी पैसे दिले. त्यांच्या आयुष्याचे एक वैशिष्ट्य म्हणजे दारावर आलेला माणूस कधीही उपाशी परत गेला नाही. स्वतः व्याजाने पैसे घेऊन घर चालवले, पण पाहुणचार आणि माणुसकी कधी सोडली नाही. त्यांचे वडील गणोरेहून पीठ आणून मदत करत, आणि त्या प्रत्येक कणाचा उपयोग कुटुंबाच्या उदरनिर्वाहासाठी करत.

मोठा मुलगा बाळासाहेब यांनी गरीबीतून आयटीआयचे शिक्षण पूर्ण केले. संगमनेर पेपर मिल , राज्य परिवहन महामंडळ येथे वाहक या पदावर काम केले. सुन वैजयंता हीनेही बिडी बांधण्याचे काम करत संसाराला हातभार लावला आणि पुढे अंगणवाडी सेविका ते अंगणवाडी पर्यवेक्षिका असा प्रवास केला. दुसरे चिरंजीव अण्णासाहेब वन विभागात सरकारी नोकरीला लागले. सरकारी नोकरी सोडू नकोस हा आईचा सल्ला त्यांच्या आयुष्याचा आधार ठरला. पार्वताबाईंच्या हातांनी रोज अडीच हजार बिड्या बांधल्या जात. पहाटे तीन वाजता उठून रात्रभर कष्ट करण्याची त्यांची तयारी अद्भुत होती. आज त्यांचे कुटुंब अभिमानाने म्हणते - आमच्या घरची लक्ष्मी म्हणजे बिड्या. कारण त्या बिड्यांच्या कष्टावरच संपूर्ण परिवार उभा राहिला.सुन गीतांजली हिने पण आज पर्यंत बिडी बांधण्याचे काम करून कामाची लक्ष्मी जपण्याचे काम केले.



त्यांचा मोठा परिवार - तीन मुली, दोन मुले, दहा नातू, सहा नाती, चोवीस पतवंडे आणि पुढील पिढी - हा त्यांच्या कष्टांचा आणि संस्कारांचा जिवंत वारसा आहे. आज त्यांच्या नातवंडांमध्ये डॉक्टर, इंजिनिअर, शिक्षक आणि विविध क्षेत्रात कार्यरत मान्यवर व्यक्ती आहेत. हेच त्यांच्या आयुष्याचे खरे यश आहे. त्यांचे पती आदरणीय पोपटगिरी गोसावी यांनी तीर्थरूप भाऊसाहेब थोरात यांच्यासोबत आयुष्यभर निष्ठेने सामाजिक आणि राजकीय कार्य केले. त्या संस्कारांची उब संपूर्ण गोसावी परिवारात आजही आहे .आमच्या आज्जी संगमनेर तालुक्याचे आराध्य दैवत असलेल्या देवगडच्या यात्रेच्या काही दिवस आधीच डॉ. सुधीरजी तांबे यांना प्रेमाने फोन करणार यात्रेला माझ्या लेकीला घेवून आलंच पाहिजे! हा त्यांचा आग्रह असायचा आदरणीय डॉ. तांबे साहेब व दुर्गाताई आले की त्या अगदी मनापासून स्वागत करायच्या. त्यांच्या हातची पुरणपोळी, भजी, कुरडई, सार आग्रहाण वाढायची .आईनं दुर्गाताई यांना त्यांनी स्वतःच्या मुलीप्रमाणे जपले, आदरणीय डॉ. साहेबांना हरभऱ्याची भाजी आवडते हे त्यांना माहीत होते. म्हणून दरवर्षी त्या स्वतः हरभऱ्याची कोवळी भाजी खुडून आवर्जून पाठवत असत. हे प्रेम कोणत्याही नात्याच्या चौकटीत मावणारे नाही. गावातील गडाख, पावसे, वाकचौरे, दवंगे, बोऱ्हाडे, सस्कर ,भालेराव, शिंदे आणि यांनी त्यांच्या गरजेच्या वेळी मोलाचे सहकार्य केले. या सर्वांचे सहकार्य कधी न विसरण्यासारखे आहे.त्या सर्वांविषयी त्यांच्या मनात कायम कृतज्ञता होती. गावातील सर्व ग्रामस्थ त्यांना गोसावी आई या नावाने हाक मारायचे व गुरुस्थानी मानायचे. त्या केवळ आई नव्हत्या; त्या एका संपूर्ण कुटुंबाचा आधारवड होत्या. त्यांचे कष्ट, त्याग, प्रेम आणि कष्टांच्या धाग्यांनी संसार विणला,त्यागाच्या मातीने परिवार घडवला,स्वतःसाठी काहीच न मागता,लेकरांसाठी संपूर्ण जीवन अर्पण केले. आज त्या आपल्यात नसल्या तरी त्यांचे विचार, त्यांचे संस्कार आणि त्यांची माया प्रत्येकाच्या हृदयात जिवंत आहे. त्यांनी जपलेली माणुसकी, कष्टाची परंपरा आणि प्रेमाचा वारसा हा आमच्या कुटुंबाचा अमूल्य ठेवा आहे.

आम्हा सर्व नातवंडांसाठी आजी म्हणजे आमच्या आयुष्यातील संस्कारांचा पहिला आणि सर्वात मोठा स्त्रोत. तिच्या सहवासात आम्ही प्रेम, माया, आदर, संयम, प्रामाणिकपणा आणि माणुसकी यांचे धडे शिकलो. तिच्या प्रत्येक शब्दात अनुभवाची शिदोरी होती आणि प्रत्येक कृतीत जीवनमूल्यांचा संदेश होता. तिने आम्हाला मोठ्यांचा सन्मान करायला, कष्टाची कदर करायला, संकटात खंबीर राहायला आणि सर्वांशी प्रेमाने वागायला शिकवले. आज ती आमच्यात नसली तरी तिचे संस्कार आमच्या प्रत्येक निर्णयात, प्रत्येक कृतीत आणि प्रत्येक यशात जिवंत आहेत. तिच्या आठवणी आम्हाला सतत योग्य मार्गावर चालण्याची प्रेरणा देतात. आम्ही तिचे नातवंडे म्हणून तिच्या संस्कारांचा वारसा जपणे, हेच तिच्याप्रती आमची खरी श्रद्धांजली आहे. तिचे प्रेम, आशीर्वाद आणि शिकवण आमच्या जीवनाचा अमूल्य ठेवा आहे.

तुझ्या कष्टांना वंदन आई,तुझ्या मायेचा सुगंध अमर,तू गेलीस तरी तुझे संस्कार,राहतील आमच्या हृदयात निरंतर.

भावपूर्ण श्रद्धांजली!

शब्दांकन
**श्री. गोसावी दशरथ बाळासाहेब सर**

सहकारमहर्षी भाऊसाहेब थोरात अमृतवाहिनी सह. बँक लि. घुलेवाडी
आर्थिक अडचण आहे का?
काळजी करु नका !
सोनेतारण कर्ज
कमीत कमी व्याजदर
जास्तीत जास्त कर्ज
SMBT BANK
बँकेच्या विविध सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी आजच आपल्या जवळच्या शाखेशी संपर्क साधावा.
✻ कर्ज रक्कम वाढ । ✻ कर्ज व्याजदर कमी । ✻ कमीत कमी कागदपत्रे
सेवा सुविधांच्या अधिक माहितीसाठी जवळच्या शाखेशी संपर्क साधा
- शाखा - घुलेवाडी (मुख्यशाखा), मार्केट यार्ड, इंजि. कॉलेज विस्तार कक्ष, मेनरोड, तळेगाव, साकूर, घारगाव, आश्वी बु।।, संगमनेर खुर्द, निमोण, राहाता

चैतन्य हॉस्पिटल
डॉ. जठार हॉस्पिटल, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
सर्व प्रकारचे मेडिक्लेम कॅशलेस सुविधा उपलब्ध
• मेडि असिस्ट इन्शुरन्स प्रा.लि.
• पॅरामाऊंट हेल्थ इन्शुरन्स
• हेल्थ इंडिया इन्शुरन्स
• FHPL हेल्थ इन्शुरन्स
• इरिक्सन इन्शुरन्स प्रा.लि.
• बजाज आलियांज इन्शुरन्स
• एसबीआय जनरल इन्शुरन्स
• ईस्ट वेस्ट असिस्ट हेल्थ केअर
• मेडसेव टीपीए प्रा.लि.
• जेनिन्स इंडिया टीपीए लि.
• ICICI लोम्बार्ड हेल्थ केअर
• टाटा एआयजी इन्शुरन्स
• रिलायन्स जनरल इन्शुरन्स
• मुख्यमंत्री सहाय्यता निधी (CMRF)
• चोलामंडलम हेल्थ इन्शुरन्स
• नॅशनल इन्शुरन्स कं.
• न्यू इंडिया इन्शुरन्स कं.
• निवा बुपा हेल्थ इन्शुरन्स
• युनायटेड इंडिया इन्शुरन्स कं.
• स्टार हेल्थ इन्शुरन्स कं.
• दि ओरिएंटल इन्शुरन्स लि.
• एचडीएफसी एर्गो इन्शुरन्स
• युनायटेड हेल्थकेअर लि.
• Go digit हेल्थ इन्शुरन्स कं.
• मणिपाल सिग्ना हेल्थ इन्शु.
• एम.डी.इंडिया हेल्थकेअर
• विडाल हेल्थकेअर प्रा.लि.
• पोलिस कुटुंब कल्याण आरोग्य योजना (MPKAY)
02425 - 224761, मोबा. 7038170382

|| ओम नमो शिवाय||
नमो नारायण, आपणास कळविण्यात येते की आमचे मातोश्री
वै. गं. भा. पार्वताबाई पोपटगिरी गोसावी
यांस
|| भावपूर्ण श्रद्धांजली ||
|| भंडारा व समाधी पुजा (तेरावा विधी)||
आषाढ कृ।। १५ शके १९४८
बुधवार दि. १२/०८/२०२६ रोजी. सकाळी ९ ते ११ वा
करण्याचे योजिले आहे. तरी आपण या कार्यक्रमास अगत्य येण्याचे करावे. ही विनंती
समाधीपुजा - सकाळी ०९ वा. महाप्रसाद - सकाळी ११ वा.
- शोकाकूल -
गं.भा. शांताबाई प्रभाकर भारती (बहिण)
तपो. भाऊगिर धरमगिर गोसावी (दिर)
तपो. बाळासाहेब पोपटगिरी गोसावी (मुलगा)
तपो. आण्णासाहेब पोपटगिरी गोसावी (मुलगा)
गं. भा. सुमन नामदेव पुरी (मुलगी)
गं. भा. राधाबाई भाऊसाहेब गोसावी (मुलगी)
सौ. शशिकला बाबासाहेब पुरी (मुलगी)
तपो. रजनिश मनोहर गोसावी (पुतणे )
तपो. शिवदास भाऊगिर गोसावी (भाऊ)
तपो. विठ्ठल रामभाऊ गोसावी (दिर)
तपो. शांताराम रामभाऊ गोसावी (दिर)
तपो. सोमनाथ लहानुगिर गोसावी (पुतणे)
तपो. वसंत माधव गोसावी (दिर)
तपो. राजेंद्र शंकरगिर गोसावी (दिर)
तपो. योगेश मनोहर गोसावी (पुतणे)
समस्त गोसावी परिवार व आप्तेष्ठ, सर्व संस्था पदाधिकारी व समस्थ हिवरगाव पावसा ता. संगमनेर
ठिकाण - हनुमान मंदिर, हिवरगाव पावसा, ता. संगमनेर, जि. अ.नगर

नोकरीची सुवर्णसंधी
'इन्वोफिक्स सोल्यूशन प्रायव्हेट लिमिटेड'
(सौर ऊर्जा कंपनी) या कंपनीस रायगड, रत्नागिरी व सिंधुदुर्ग जिल्ह्यांसाठी खालील पदांसाठी उमेदवारांची आवश्यकता आहे
पदे: Field Sales Executive
Business Development Manager
कार्य क्षेत्र : रायगड । रत्नागिरी । सिंधुदुर्ग
पात्रता
* कोणत्याही शाखेतील पदवीधर
* विक्री व मार्केटिंग क्षेत्रातील अनुभवास प्राधान्य
* उत्तम संवाद कौशल्य व प्रवासाची तयारी आवश्यक
* स्वतःची दुचाकी, वैध ड्रायव्हिंग लायसन्स असणे आवश्यक
सुविधा
आकर्षक वेतन, प्रोत्साहनपर इन्सेंटीव्ह, पेट्रोल भत्ता, वैद्यकीय विमा, पीएफ सुविधा
संपर्क - RSM (Raigad): 7030334196
HR Head : 7030334165

दर्शन टेक्सटाईल मार्केट
तुमच्या प्रत्येक लूकसाठी खास डिझाइन्स
30% ते 70% डिस्काउंट सेल
सेल नव्हे होलसेल सेल
मान्सून ऑफर
टी शर्ट | जिन्स | फॉर्मल ड्रेस ब्लेझर | जाकेट
संपर्क :- 8390005001 पत्ता:- जाणता राजा मार्ग, IDBI बँक समोर, संगमनेर 422605

अविवाहित, नवविवाहित, चाळीशिनंतरच्या, लठ्ठ, मधुमेह, थायरॉईड, PCOD सारखे हार्मोनल डिफेक्ट असलेल्या
स्त्रियांच्या समस्या
मासिक पाळीच्या तक्रारी
अंगावरून पांढरे जाणे
गर्भ न रहाणे
वारंवार गर्भपात होणे
गर्भाशयात गाठी
गर्भाशयाचा कर्करोग
♦ स्तनांची वाढ न होणे
♦ स्तनातून दूध न येणे
♦ स्तनात गाठी
♦ स्तनाचा कर्करोग
♦ योनी मार्गाची दुर्गंधी
♦ गुप्त अंगाला खाज
♦ विविध त्वचा विकार
♦ गुप्तरोग, गर्मी
♦ लघवीला जळजळ
♦ संभोगात रस न येणे
♦ संभोगा विषयीची भीती
♦ हस्तमैथुनाची सवय
♦ लैंगिक विकृती
♦ मानसिक नैराश्य
डॉ. मोना अभय मुथा
B.H.M.S., C.G.O., D.Ac
होमिओपॅथिक कन्सल्टंट स्त्री रोग चिकित्सक
( ३० वर्षांचा प्रदीर्घ अनुभव )
1 लाखांहून अधिक महिलांचा यशस्वी उपचार
ISO मानांकन प्राप्त
डॉ. मुथाज् होमिओपॅथिक क्लिनिक विनायकनगर, नगर - पुणे रोड, अहिल्यानगर
www.homoeopathictreatment.in 91 30 30 90 13

स्वास्थ्य रक्षणाय् रोग परिमार्जनाय्
KH
कुटे हॉस्पिटल अँड लॅप्रोस्कोपी सेंटर
डॉ. सोनाली प्र. कुटे (M.B.B.S.) Physician & Anasthhetist
डॉ. प्रदीप भाऊसाहेब कुटे (M.S.) Laproscopic Surgeon & Endoscopist
डॉ. निखील रहांगडाले Orthosurgeon
डॉ. सुनिल दिघे Cardiologist
डॉ. फैमुद्दीन शेख Medicine
• सर्जरी विभाग • डायलिसीस विभाग • हृदयरोग विभाग • जॉईंट रिप्लेसमेंट
• अतिदक्षता विभाग • सुपर स्पेशालिटी विभाग • मेडिसीन विभाग • स्पाईन सर्जरी
• अपघात विभाग • न्यूरोविभाग • अद्ययावत कॅथलॅब • मॉड्युलर ऑपरेशन थिएटर
सर्व मेडिक्लेम व कॅशलेस सुविधा
पंतप्रधान व महात्मा ज्योतिराव फुले जनआरोग्य योजना
ॲम्ब्युलन्स व २४ तास अत्यावश्यक सेवा
8888882225
४० फुटी डीपी रोड, ताजणे मळा, नवीन नगर रोड, संगमनेर
(०२४२५) २२६६८८, २२६६८६

दैनिक युवावार्ता हे दैनिक, सौ. सुशीला किसन हासे, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्. कॉलेज रोड, संगमनेर-४२२६०५, जि. अ.नगर (महाराष्ट्र) यांनी आनंद प्रिंटर्स, प्लॉट नं. ४/ब, सावतामाळी नगर, बी.एड्.कॉलेज रोड, संगमनेर - ४२२६०५ जि. अहमदनगर (महाराष्ट्र) येथे छापून त्याच ठिकाणी प्रकाशित केले. संपादक सौ. सुशीला किसन हासे, मुद्रक, आनंद प्रिंटर्स, (सुशीला किसन हासे), फोन (०२४२५)२२५१२९. या अंकात प्रसिध्द झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक, संचालक सहमत असतीलच असे नाही. (संगमनेर न्यायकक्षेत्र) Email - dailyyuvavarta@gmail.com, RNI No. MAHMAR/2007/24252 पोस्टाचा परवाना क्रं. BII/RNP/SRP/25/2023-25